

# शिवराज

१९७६-७७

Scanned with CamScanner

## कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज.

# ❀ शिवराज कॉलेज ❀

## १९७६ - ७७

- अध्यक्ष -

**मा. बाळासाहेब माने**

- प्रमुख -

प्रा. [illegible] व्ही. एस.

-- विद्यार्थी प्रतिनिधी -

पाटणे आर. के.

सूचना :- ● ही खूण असलेली ब्लॉक छपाई 'दिनकर प्रिंटिंग प्रेस' मध्ये केलेली आहे.

Statement about ownership and other particulras about newspaper ' Shivraj ' Miscellany of Shivraj College, of Gadhinglaj to be published in the first issue every year after last day of February.

Form No. le No. 8 )

| | |
|---|---|
| Place of publication | Shivraj College Gadhinglaj |
| Periodicity of publication | Annual |
| Printer's Name – | Mohan Dinkarrao Shinde |
| Nationality – | Indian |
| Address – | Dinkar Printing Press, Gadhinglaj. |
| Publisher's Name – | Prin. B. B. Deshmukh. |
| Nationnality – | Indian |
| Editor's Name – | Prof. Banne V. S. |
| Nationality – | Indian |
| Address – | Shivraj College ,Gadhinglaj. |

I, B. B. Deshmukh hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Gadhinglaj

B. B. Deshmukh
Signature of Publisher

मुद्रक :- दिनकर प्रिंटिंग प्रेस, गडहिंग्लज. ❊ ब्लॉक मेकर व ब्लॉक छपाई लक्ष्मी प्रोसेस, कोल्हापूर.

Scanned with CamScanner

# किंचित् संपादकीय

शेवटी मॅगेझीन काढलंच की नाही ?

कांही झालं तरी शिवराज कॉलेजमधल्या गुणसुंदर विद्यार्थ्यांच्या इच्छा डावलल्या जाणार नाहीत, या आमच्या सदीच्छेचंच द्योतक आहे. " आता कुठलं काय आलंय — सर, यावर्षी निघणार आहे का मासीक ? " " काय सर, मँगेझीन आणायला निघाला आहात का ? " " जरा धीरानं घेरे ! यंदांचं मॅगेझीन स्पेशली स्पेशल निघणार आहे. जरा उशीरा होणारच " अशी स्वयंभू संभाषणं ऐकता ऐंकता सत्याहत्तरचं शैक्षणीक साल सरलंही. तरी काम टप्प्यात येईना. पण छात्रांच्या वरवराच्या बोलण्यातलं छद्म आणि चिवट चिकाटी काही संपली नाही.

" सर- "

" हां, हां आलं लक्षात– "

" ते नाही . . . ते ह्याचं काम झालं ? "

" तेच तेच. काम सुरू आहें " आमची ही चिकाटी दांडगी.

पण या सर्वात छापखानेवाल्याची चिकाटीच जास्त महत्वाची. दोन दोन महिने कंपोझिग तसंच ठेवांयचं आणि मँगेझीन सलाईनवर ठेवूनही जिवंत राखायचं ही पुण्याई तरुण प्रेस संचालक **श्री. मोहनराव शिन्दे** यांची, कोल्हापूरचे लक्ष्मी प्रोसेसवाले जोशी बंधू यांचहि तितकंच कौतुक करायला हवं. मित्रहो, कॅालेज अनेक वळण वाटातून विकास पावत आहे. त्यात तुमचाच भाग फार मोठा आहे. शिवराज कॉलेजातली मुलं ' देव – मुलं ' आहेत, असं आम्ही म्हणत आलो आहोत – एकाद्याच्या अंगात मधेच कुठं देव आला तरी तेवढयानं त्यांचं देवपण नाकारायचं कारण नाही. तुम्ही सोशिक आहात समंजस आहात. तुमच्या स्वभावसुंदर वागण्यामुळंच ह्या कॉलेजला शोभा आहे.

तुम्ही धीरानं सारं घेतलात. पोटभरून धन्यवाद ! ' धीर धरीरे धीरा पोटी यामुळंच अखेरी हे गोमटं फळ जन्माला आलंय तुमचे आभार.

जेवढयास तेवढाच तुम्ही उत्साह दाखविता. सातत्य, परिश्रम, रसिकता ही जपावयाची असतात. जोपासायची असतात. तुमचं आपलं तेवढयाच पुरतं. तुमच्यावर रागावयाच आहे. पण आता नाही.

या अंकात माझं काहीच नाही, उशीर झाला तरी चालेल, पण विद्यार्थ्यांना अंक द्यायचा; प्राचार्यांच्या या दृढ निश्चयामुळंच हा अंक प्रसिध्द होत आहे. त्यानाच याचं श्रेय आहे. मा. प्रिन्सिपॉल बलवंतराव देशमुख यांची विद्यार्थ्याविषयीची तळमळ याची ही खूण !

यात बराच अपुरेपणा आहे. परिस्थितीच तशी असली तरी साऱ्या उण्यादुण्याची नैतिक जबाबदारी मी घेत आहे. यात बाकीच्या बऱ्याच गोष्टींना फाटा देण्यात आला आहे. जे आहे ते गोड करून घ्याल याची निश्चित खात्री आहे. तुमच्याच धीरावर मी पुढं झालोय.

धन्यवाद ! –

हो – दिनकर प्रिंटिंग प्रेसच्या सर्व कामगारांना कसं विसरता येईल ?

**प्रा. विठ्ठल बन्ने**

Scanned with CamScanner

## जिमखाना विभाग :–

अध्यक्ष : प्राचार्य बलवंत देशमुख

सभापती : प्रा. व्ही. एस. बन्ने

श्री. पाटील आर. एस. जनरल सेक्रेटरी

| | |
|---|---|
| १) सांस्कृतिक कार्यक्रम करमणूक व प्रसिद्धी | प्रा. के. बी. केसरकर |
| २) वक्तृत्व. खेडे दत्तक-योजना | ,, के. व्ही. कुराडे |
| ३) भारतीय खेळ, मायनर गेम्स, अॅथलेटिक्स | ,, ए. एल. नाळे |
| | ,, सौ. एस. एम. जगताप |
| ४) सहल | ,, ए. ए. पवार |
| ५) नियतकालिक, भित्ती–पत्रके (मॅगेझीन) | ,, व्ही. एस. बन्ने |
| ६) स्त्री विभाग प्रमुख | ,, सौ. एम. एन. कोटीभास्कर |
| | ,, ,, एस. एम. जगताप |

विद्यार्थी प्रतिनिधी –

| | |
|---|---|
| १) सांस्कृतिक कार्यक्रम प्रसिद्धी | श्री. संकपाळ एस. पी. |
| २) वक्तृत्व खेडे दत्तक–योजना | ,, कोळेकर के. एल. |
| ३) भारतीय खेळ | ,, कोणकेरी बी. के. |
| ४) सहल–हॉकी | ,, माळी आर. एस. |
| ५) नियतकालिके, भित्तीपत्रके (मॅगेझीन) | ,, पाटणे आर. के. |
| ६) मायनर गेम्स | ,, गवसेकर वाय. के. |
| ७) अॅथलेटिक्स | ,, पाटील एम. जी. |
| ८) एल. आर. | कु. बेकनाळकर रंजना |
| | ,, जोशी जयश्री |

### डिसिप्लीन कमिटी

प्रा. डॉ. एस. जी. गोकाककर (चेअरमन)

| | |
|---|---|
| प्रा. एस. टी. जाधव | प्रा. एन. आर. दुंडगेकर |
| प्रा. व्ही. एस. बन्ने | प्रा. ए. एस. नाळे |

Scanned with CamScanner

चेअरमन



माननीय बाळासाहेब माने

Scanned with CamScanner

# प्राचार्य



मानवीय बी. बी. देशमुख

Scanned with CamScanner

# —: मराठी विभाग :—



तुफानावर मांड कसली आणि हाती विजेचा आसूड घेऊन तरूण निघाले की विजय निश्चित आहे.

युवा खांद्यावर जो आपली तरुणाई घेऊन, उफाळते तारुण्य घेऊन पुढे झेपावत रहातो तो तरूण जेव्हा प्रेम, विश्वास व सामर्थ्य यांचा ; दर्शन, तळमळ आणि प्रबोधन यांचा ; शिक्षण, संशोधन आणि विस्तारण असा रस्ता आपण धराल आणि एकेक पाऊल पुढें टाकाल तेव्हा आपला विजय निश्चित आहे.

— बाबा आमटे

Scanned with CamScanner

# आकुंदे जोगवाऽऽऽ

**परशराम मेंडके**
पदवीपूर्व साहित्य

दिवस मावळतीला गेला होता. थोड्याच वेळात तांबूस रंग पृथ्वीनं गिळून टाकला. भर उन्हाच्या तडाख्यानं ताठरलेली झाडाची पानं टवटवीत दिसत होती. गार वारा सुटला होता. त्या गार वाऱ्याच्या झोकात झाडं डुलत होती. वारा फुलांचा वास घेऊन येत होता. तो त्या म्हारवाड्यात शिरत होता. त्या म्हार- वाड्यात बाळू म्हाराचं घर होतं. त्याची बायको हौसा आणि तिला एकुलती एकच पोर होती. ती म्हणजे शांता. पोर लहान असतानाच बाळू म्हार वारला होता. त्याला थोडेच दिवस झालं होतं. आता त्या घरात हौसा आणि शांता दोघीच होत्या.

पौर्णिमेची रात्र होती. हौसा आपल्या दारापुढील अंगणात बसली होती आणि ती पोर हौसाच्या मांडीवर डोकं ठेऊन पडली होती. तिच्या झिज्या कपाळभर विस्कटल्या होत्या. तिची नजर आभाळातील चांदण्या- कडे लागली होती. त्या पिठोऱ्या चांदण्यात ती मायलेकरं अस्वस्थ होती. कोणी कोणाकडं बघत नव्हतं. हौसा कपाळावर हात ठेऊन बसली होती. तेवढ्यात शांताची नजर आपल्या आईकडे गेली. आपली आई कसल्यातरी विचारात आहे हे बघून ती म्हणाली 'आई, कसला ग इचार करालीस ?' एकाएकी ती बावरल्यागत झाली आणि म्हणाली 'कसला इचार करायचा लेकी, उद्याच्या पोटाचाच. अजूनही न सांगितलेली गोष्ट तिनं शांताला सांगितली. हे ऐकल्यावर शांता म्हणाली 'आई असा किती दिवस इचार करायचा ग ? थांब मी उद्याच्या उद्या काळजी नाही करतो?'

" ते कसं ग पोरी ? " तिची आई म्हणाली.
"मी उद्याठावणं बंडू पाटलाच्या घरात कामाला न्हातो"
हे शांताचं शब्द ऐकताच आईचं हृदय आनंदानं भरून आलं. तिला मनापासून दुख: वाटत होतं, पण नाईलाज होता. काय करणार बिचारी.

दुसऱ्या दिवशी सकाळी शांता उठली आणि बंडू पाटलाच्या घरला निघाली. बंडू पाटलाचं घर जवळच होतं. बंडू पाटील नुकताच न्हेयागी करून बसला होता. त्याची बायको गुणाबाई जेवणाला लागली होती. त्याच्या गोठ्यात खाऊन सुन्न झालेल्या म्हैशी डोळे झाकून रवंथ करीत उभ्या होत्या. त्याचा एकुलता एक मुलगा रामू तो जवळच्याच शेताकडे गवत आणण्यासाठी गेला होता. बंडूनं आपल्या शेतात घर बांधलं होतं आणि त्या घरात बैलं होती. जवळच गाडीसाठी एक खोपटं बांधलं होतं. त्या गावात जमिनीविषयी बंडू पाटलाचंच नाव पुढं होतं.

विचारात मग्न झालेल्या बंडूची नजर दारातल्या पोरीकडं गेली, त्यानं जाणलं की ही पोर बाळू म्हाराची असावी. त्याच्या घरी बाळू म्हार येऊन लाकूड फोडून देत होता आणि मिळालेली भाकरीं घरात नेऊन देत होता, पण तीच भाकरी आता दुसऱ्या म्हारानं घेतली होती. त्यानं त्या पोरीला आत बोलावलं आणि विचारलं
" कशाला आलांस?"
" मी तुमच्यात कामाला न्हानार हाय. "
पोरीकडं बघून त्याच्या मनात दया आली आणि त्यानं तिला ठेऊन घेतली.



Scanned with CamScanner

दररोज शांता बंडू पाटलाच्या घरी जाऊन म्हैशीचे शेण काढायची, आपल्याला झेपेल तेवढं काम करायची पोटभर जेवून गुणाबाईनं दिलेली शिळी भाकरी आणून आईला द्यायची, अस काम करु लागली.

असेच दिवसामागून दिवस जात होते. शांताबाई आता तारुण्यात आली होती. ती रामाच्या शेतावर जाऊन काम करीत होती. बंडू आता म्हातारा झाला होता. त्याचा सर्व भार रामानं उचलला होता. गुणाबाई शेतावर जात नव्हती. ती फक्त जेवण करण्याच्या कामाचीच होती. बाकी सर्व काम रामालाच करावं लागत होतं.

शांताबाई तारुण्यात आल्यावर गोरीपान दिसत होती· तिचे ते डोळे, टवटवीत गाल नि तारुण्यानं सळसळणारा मुसमुसणारा बांधा, सळसळतं तारुण्य अंगोपांगातून खेळत असणारी ती पोर रामाच्या मनाची छबी होऊन राहिली होती. रामाच्या डोळ्यात कायम शेतावर काम करणारी शांताच दिसत होती. तिच्या तारुण्यानं रामाला वेधून घेतलं होतं.

शांताच्या आईला आता काळजी लागली होती. ती पोटाची नाही, तर आपल्या पोट भरणाऱ्या शांताची. तिच्या मनात विचार यायचा तो नुसता शांताच्या लग्नाचा. 'पोर वयात आलीया, पोरीचं लगीन लवकर करावं. आताचं दिस लई वाईट हाईती' असं तिच्या मनाला कोनतरी न्हाऊन न्हाऊन बोचण्या देत होतं. पोरीचं लग्न कराव ही एकच आशा तिला उरली होती.

एके दिवशी रामा उठला, न्याहारी केला नि शेताकडं गेला. बैलं गोठ्यात रवंथ करीत बसली होती. ती रामा आल्यावर खडबडून उठली ते बघून रामानं त्यांना पाणी पाजलं नि गवत टाकून दारातल्या हुंबऱ्यावर येऊन बसला. त्याची नजर शांताच्या वाटेकडं होती. घर वाटेवरच होतं. आज कामावर कोणी न्हाई. आम्ही दोघंच. शांता आल्यावर आज खूप खूप मजा करायची. असं त्याला वाटत होत. तेवढ्यात त्या वाटेवर तांबडं पातळ नेसलेली शांता दिसली. त्या पातळाची रेशमी धडी उन्हानं चकाकत होती. तिच्या डुईवर बुट्टी होती· रामा उठला, बैलांना परत गवत टाकलं. जेम नामं सारलं. काम आटोपून घोंगडं घेतलं नि ते हांतरून आडवा पडला. इतक्यात शांता आली. तिनं बुट्टी उतरली नि काम विचारण्यास रामाला उठवायला गेली, "आवं, उठा की, मी आलेया. काम सांगा काय त्ये" रामा जागाच होता. त्यानं तिचा हात धरला आणि म्हणाला.

"अग कसलं काम करतीस आज?"

"सोडा माझा हात. कोणतरी ईल की, वाटवरचे घर हाया." शांता म्हणाली. लांबून कोणाचा तरी आवाज येत होता पण रामाला शांताचा हात सोडवत नव्हता.

काही दिवसांनी शांतान केलेलं हे पाप न कळत तिनं आपल्या आईला बोलून दावलं. त्यावर तिच्या आईचं अंग लटकं पडल्यागत झालं. तिला कांहीच सुचेनासं झालं. ती रामाच्या बापाकडं गेली. त्याच्या पायावर डोकं ठेवून विनवण्या करु लागली. "तुमच्या लेकानं माझ्या पोरीच्या जन्माचं वाटोळ केलं. सोन्यासारखी पोर तुमच्या घरला कामाला न्हायली. मजी असं करायच व्हय, रोजच्या पोटावर जगणारी आमी मानसं. तुमीच सांगा तिनं आता काय करायचं?" असं म्हणून ती कपाळावर हात ठेवून बसली.

बंडू आपल्या लाडक्या लेकाला एकही वाईट शब्द बोलला नव्हता. पण आता बोलून तरी काय? तो म्हणाला "हौसा, शांताला आता देवालाच सोडूया, त्याच्या बिगार उपाय न्हाई" असं सांगून त्यानं हौसाची समजूत घातली आणि हौसानंही ते नाईलाजाने कबूल केलं.

सुखी संसाराची स्वप्न रंगवणारी शांता, आता हातात पडली घेऊन हिंडताना म्हणत असते,

"आकुंदे जोगवाऽऽ!"



Scanned with CamScanner

# स्फूर्ति स्थान

जे. बी. पाटील
बारावी आर्टस्

थोर पुरुषांची चरित्रे म्हणजे इतिहास होय. हे कार्लाइलचे उद्गार निश्चित वास्तवाला धरून आहेत. आपल्या महाराष्ट्राला तीन वरदाने लाभलेली आहेत. सह्याद्री, समुद्र आणि शिवाजी, त्याचप्रमाणे आम्हा मराठ्यांना लाभलेले चौथे वरदान म्हणजे 'बाबा आमटे'.

दीन दुबळ्यांचे कैवारी आणि कुष्ट पीडिताशी अलोट नाते जोडणारे हे धन आपल्या महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आले. स्वतःला अपंगाकडे वाहून घेण्याचा प्रयत्न आणि त्यांच्यातील कमीपणा नष्ट करण्याचं ध्येय हे दोन हेतू त्यांचा मनावर बिंबलेले आहेत. कवडी चुंबका एवढी ज्यांची किंमत आहे, ज्यांना जगाचे दर्शन होणार नाही त्यांची प्रतिष्ठा, त्यांचा मान आणि सन्मान ज्ञानाच्या बाजार पेठेत आणि सुदृढ मानवाच्या लोकशाहीत, अपंगशाहीच्या मनोराज्याचे व्यवहारात प्रत्यक्ष दर्शन घडवून आणतो.

सरकारने नाकारलेली दोन हजार एकर रेताड, नापीक अशी जमीन बाबांनी मागून घेतली. एखादा जंगलात गेलेला मानवप्राणी, पुन्हा इहलोकी येणे कठीण अशा घनदाट जंगलात बाबांनी वास्तव्य करुन, तेथील हिंस्त्र प्राण्यांना स्वतःच्या हातात बंदूक घेऊन, त्यांनी सळो कीं पळो करून सोडले. राक्षस, हिंस्त्र श्वापदे यांच्यापासून रक्षण होण्यासाठी क्षत्रीय राजांना हाक मारण्याचा व आपले कार्य शांतपणे आचरण्याचा तो काळ नव्हता. तेंव्हा या महर्षिने स्वतःच्या हातात नग्न शस्त्र धारण केले व त्याच मातीत अपंगशाहीचा राज्याभिषेक घडवून आणला.

बाबांनी अपंगाना काय दिले? जगण्याची इच्छा! स्वतंत्रपणे संचारण्याची ऐट! अपंग देहाला नव्हेत, सुदृढ देहालाही न पेलणारी कर्तबगारी आणि निर्गंग जगाला उदार गुमान! विज्ञानाच्या आणि श्रीमंतीच्या छायेत वास करणारी महारोगी बाई बाबांच्या आश्रमात सूत कातते आहे. पोराबाळांना असह्य झालेला जन्मदाता, बाबांच्या आश्रमात येऊन कंबोल, चाव्या, अत्याधुनिक शेती इ, व्यवसाय करतो. त्या कमाईतून स्वतःला विसरून चैन करतो आहे व उरलेल्या पैशाची पाठवणी हातापायांनी धडधाकट असलेल्या नातलगाना करतो आहे. जगाचीच काय पण त्या आश्रमाची भीक त्या पिडीतास घेऊ देत नाहीत. प्रत्येकजण आपल्या कमाईतून खर्च करतो.

ज्याप्रमाणे महाराष्ट्र प्रसिद्ध व भारत प्रसिद्ध शंतनुराव किर्लोस्करांचा खात्रीलायक उद्योग, त्याचप्रमाणे पद्मश्री बाबा आमटेंच्या सजीव मानव निर्मितीचा कारखाना आहे. इंजिनाचा एखादा भाग नाहीसा व्हावा व किर्लोस्करांच्या कारखान्यात नेऊन दुरूस्त करून आणावा, त्याचप्रमाणे मानवी नादुरूस्त झालेलं इंजिन बाबांच्या कारखान्यात जावं, त्या ठिकाणी नाविन्य मिळवावं, काय महान किमया आहे! बाबांची महाराष्ट्राला, महाराष्ट्राबाहेरच्या भारताला आणि परदेशातल्या मानवप्रेमी जनतेला जी ओळख आहे, ती एक लोकविलक्षण मानव निर्मितीचा कारखानदार म्हणून



Scanned with CamScanner

बाबाच्या या कारखान्यात यंत्रेच तयार होत नाहीत तर प्रतिभा संपन्न आणि कर्तव्यसंपन्न हृदयाची माणसे तयार होत असनात. एकेकाळी महारोगानें ग्रस्त झालेल्या धट्टया कट्टया माणसापेक्षा केवढ्या आत्मविश्वासाने जीवन कंठतात. ही माणसे नवनव्याने कामाचे डोंगर कसे उचलतात हे सिद्ध करण्याचा कारखाना आहे-

वडिलार्जित जमीन कुळाकडे पचू देणारे व अर्ध्या आयुष्यात साध्या वखारीलाही हात न लावणारे बाबा आमटे नावाचे हे वकील एक दिवस आगळ्या विचाराने ऐष आरामीतून नाहीसे झाले. नेहमीच्या झगमगत्या रंगीत जगाशी दोस्ती सोडून देऊन रस्त्यात व उकिरड्यात पडलेल्या आणि आधुनिक मानवाला असह्य झालेल्या महारोग्याशी त्यांनी सोयरीक केली. सर्वांना समवेत घेऊन त्यांनी मातीशी संपर्क साधला व रोजच्या खडकाळ जमिनीत रक्त ( कष्ट ) घाम आणि अश्रू या त्रिवेणी संगमातून त्यांनी नंदनवन निर्माण केले. बाबा आणि माती, एवढाच त्यांचा संबंध ! एकवेळ माता त्यांना आवडणार नाही, पण आपल्या सहकाऱ्याचा आणि मातीचा विसर क्षणभर ही पडणार नाही. मातीला एवढे महत्व देण्यासाठी बाबाच्या जवळ भरपूर असे दाखले आहेत. एखाद्यानी जगाच्या दयेला पात्र व्हायचे व हातात भिक्षापात्र घेऊन आपल्या अपंगत्वाचे प्रदर्शन सर्वाच्या समोर ठेवणाऱ्या महारोग्याना बावानी येऊन इथल्या जमिनीचें दोस्त बनविले- अहोरात्र जिवाचे रान करून अधुनिक महाराष्ट्रीयांना लाजवील अशी महान हरित क्रांती घडवून आणली. आपल्याला पुरे होऊन मालाची बाहेर पाठवणी करण्याइतपत त्यांची मजल गेली. एकवेळ वानरांच्या सहकार्याने लंकेवर विजय मिळविणाऱ्या रामाचे उदाहरण देखील या ठिकाणी कमी प्रतीचे ठरेल.

पाखरू जसे चिरकाल तरुण असते, तसेच बाबा पण चिरतरुण आहेत. ते नहमीच तरुणांची बाजू घेत असतात ज्या नव्या जगाची ओळख करून विज्ञान युगातल्या मानवासाठी त्यांनी अनेक आदर्श योजना आखून ठेवल्या आहेत. आजच्या तरुण पिढीला वाट-चाल करण्या विषयी आव्हान देत आहेत. ते म्हणतात. "बाबांच्या झंझावाता प्रमाणे आजच्या तरुणांची समाज सुधारण्याकडे झेप गेली पाहिजे ".

बाबांनी साध्या सुध्या गोष्टीत लोकांच्यात विलास व विकास साधला आहे. आजच्या लोकशाही-तील तरुणांना हा महामंत्र दिला तर तो बिघडणार नाही.

बाबा आमटेंची प्रतिभा, त्यांचं लोकोत्तर कर्तृत्व, अलौकिक कविजीवन, अखिल जीवनातलं नाटय आणि साऱ्या विश्व व्यवहारातलं ' थ्रिल 'पाहण्यासाठी तरुण-तरुणींनी एकदा तरी ' आनंदवना ' ला भेट देणे आवश्यक आहे.

**शील :**

**माणसाच्या उच्चारावरुन विद्वत्ता समजते. आवाजावरून नम्रता कळते, वर्तमानावरुन शील समजते. त्यात काय अवघड ! माणूस सहज ओळखता येतो.**

# बदला :-

हुद्दार पी. जी.
प्रथम वर्ष साहित्य

वैजनाथच्या पायथ्याशी एका चिमुकल्या टेकडीवर 'करेकुंडी' गाव वसलेला आहे. जंगलाने वेढलेल्या या गावात भयाण शांतता आणि काळाकुट्ट अंधार पसरलेला असतो. गावात रस्ता नाही की दिवा-बत्तीची सोय नाही. डोंगराच्या मध्यभागी मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात सारा गाव वावरत असतो. गावात फक्त १५ – २० घरे आहेत. ४ – ५ बेरडाची घरे आहेत. अशा या जंगलाच्या मध्यभागी एकीकडे श्रीमं-तांचा कळस आणि दुसऱ्या बाजूला दीनदुबळी गरीबी यांचा संघर्ष चालू असतो. गावात इनामदारी, वतनदारी आणि पाटीलकी गाजविणारी दोन श्रीमंताची घरे आहेत. म्हादू पाटील आणि तुकाराम पाटील या दोन घराण्यात कायम संघर्ष चालू असतो. म्हादू पाटील उंच, धिप्पाड, गोरापान आणि ओठावर भरदार मिशा व उग्र चेहरा असा करारी वृत्तीचा होता. सारा गाव त्याला दचकून वागत होता. खांद्यावरती बंदूक टाकली की त्याला भय नव्हते.

तुकाराम पाटील सुद्धा काही कमी दर्जाचा नव्हता. गावात जेवढा म्हादू पाटलाचा वचक होता, तितकाच त्याचा पण वचक होता. अंगाने जाड-जूड, पिकलेले केस आणि ओठावर पांढऱ्या मिशाचे झुलपे ते कायम ताठ असा हा रागीट आणि तापट स्वरूपाचा तुकाराम पाटील गावातून फिरते वेळी सारे त्याला नमस्कार करीत. आणि ताठ मानेनें नमस्कार स्वीकारून तो पुढे जात होता.

पावसाळ्याचे दिवस होते. चिखल आणि दलदल माजली होती. त्यामुळे वातावरण कोंदट वाटत होते. मधून मधून पावसाच्या हलक्या सरी कोसळत होत्या. म्हादू पाटील या कुशीवरून त्या कुशीवर अंथरुणात लोळत पडला होता. त्याने धोंडीबाला बोलावणे पाठवले होते. पण धोंडीबा अजून आला नव्हता. धोंडीबा नाईक एक अस्सल बेरड होता. तो पाटलाच्या शेतात काम करीत होता. आपला उदर-निर्वाह चालवीत होता. गरिबीत दिवस काढीत होता. त्याला काही तरी मोठे काम करावेसे वाटत होते. पण दिवसभर राबून संध्या-काळी म्हादू पाटलाच्या शेताची राखण केल्यानंतर त्याला शेर-दीड शेर दाणे मिळत असत. इमानाने राबून सुद्धा कामाचा मोबदला त्याला मिळत नव्हता. पण काय करणार ? इकडे म्हादू पाटील त्याची वाट पहात होता. धोंडीबा नाईक आला. धोंडीबा रामराम करीत त्याला म्हणाला. "मला कशास बलविल्याशी".
"आलास धोंडीबा बस खाली. तुझ्यावर आज मोठं जोखमीचं काम देणार हाय".

"कसलं काम ? सांगा, ह्या गरीबास कसली जोखीम देणार हायीसा. मी तुमचं काम न्हाई म्हणनार न्हाई" धोंडीबा म्हणाला.

म्हादू पाटील त्याच्या जवळ जाऊन बसला व म्हणाला, जरा हळू बोल धोंडीबा. भिंतीलाबी कान असत्यात. उद्या शनवार हाय, बेळगावचा बाजार हाय.



Scanned with CamScanner

तवं तुत्या जाणार म्हणी. दिवस मावळोसच तो परत येणार हाय. तवं तू कणवीत गाठूनच त्याला सरळ कर. "हे काम मला जमाईचं न्हाई पाटील" धोंडीबा म्हणाला.

"अरं, ते पिकलेलं पान हाय. एका ठोस्यासरशी खाली पडेल" म्हादू पाटील म्हणाला". न्हाई पाटील तुमच्या पाया पडतो. हे काम मला व्हणार न्हाई" धोंडीबा म्हणाला.

" धोंडया लेका तुला मी बक्षिस देईन"

माझ्या गळयातला कंठाहार तुझ्या गळयात घालीन हाईस कुठ लेका? हे घे तवर १० रुपये खरच कर,

दुसरे दिवशी शनिवार उजाडला. धोडीबा नाईक फरशीला घासून घासून धार काढीत होता खांद्यावर फरशी टाकून तो म्हादू पाटलाच्या शेतावर गेला.

"पर, व्हय पाटील, अनि मला थोडं पैसे देवा, बायको उपाशी हाय. तिला नेसोस लुगडं सुद्धा न्हाय" धोंडीबा म्हणाला.

"मर्दा, आधी काम तरी कर. मी काय कुठे गाव सोडून जातोय व्हय. काम झाल की मी तुला बक्षिस देणार हाय. व्यवस्थित काम कर आणि त्येंचा मुडदा त्या रक्ताच्या हाळयात भिरकटून ये म्हणजे कुणास पत्त्या भी लागोचा न्हाय" म्हादू पाटील म्हणाला.

काम एकदा फत्ते झालं की, धोंडीबाला पोलीसांची भिती दाखवायची अशी त्याची समजूत होती. म्हणजे धोंडीबा नाईक कांही सुद्धा मागणार नाही. आज त्याच्या आड येणारा काटा जाणार आणि आपणाला मान मिळणार: सारा गाव माझ्या ताब्यात राहणार अशी स्वप्ने रंगवत तो घरी आला.

संध्याकाळची वेळ होती. दिवस आईच्या पोटात गेला होता. धोंडीबा नाईक एकटाच कणवीच्या दिशेने निघाला. आजपर्यंत हजारो पापे, आणि खून याच कणवीत झाले होते. काळाकुट्ट अंधार पसरत चालला होता. जांभळीच्या व सागवानच्या झाडांची चिक्कार गर्दी होती. आणि त्यातूनच एक पायवाट गेली होती. रात किडे किरकिरत होते. दिवस पावसाळ्याचे त्यामुळे जिकडे तिकडे काजवे चमकत होते. पानांचा भेसूर आवाज निघत होता. आज त्या रक्ताच्या हाळयात आणखी एक प्रेताची भर पडणार होती आणि त्या हाळयाची भूक शांत होणार होती. वाटेत मध्यभागी एक प्रचंड मोठया आकाराचा दगड आहे. त्याच्यावर वीज पडून तो दुभंगला गेला आहे. त्याच फटीत धोंडीबा नाईक फरशी सावरून आणि घोंगडे अंगावर घेऊन आपल्या भक्षाची बाट पहात होता. एक आक्राळ-विक्राळ यम त्या दगडाच्या फटीत बसला होता. त्याचे ते धैर्य पाहून दगड सुद्धा कापत होता. रात्रीच्या वेळी कण-वीच्या वाटेकडे कोण फिरकत नसे. पण आज तुकाराम पाटील त्या वाटेने परत येणार होता. त्याचा रस्ता तिथेच संपणार होता. जीवन म्हणजे योगायोग. मृत्यू ही जीवनाची शेवटची पायरी आहे. व याच पायरीवर तुकारामाला थांबावे लागणार होते. धोंडीबाच्या मनात अनेक विचार येत होते. मी कशाकरीता इथं आलो? खून कुणाचा करायचा? का करायचा? शेवटी त्याचं मन त्याला उत्तर देत होते. पोटासाठी बक्षिसासाठी!

इतक्यात त्याची तंद्री भंग पावली. कुणाची तरी राकट पावले त्या वाटेने येत होती. त्याला सामना देण्यासाठी धोंडीबा फरशी तयारीत ठेऊन उभा राहिला. तुकाराम पाटील एकटाच हातात फरशी घेऊन झपाझप पावले टाकीत होता. तुकारामाच्या हातातील सज्ज फरशी पाहून धोंडीबा चरकला. तुकाराम धोंडीबा पासून सात–आठ फूट दूर गेला होता. बघता बघता धोंडीबाने त्याच्या मानेवर घाव घातला. तेव्हाच तुकारामाने पाठीमागे आपली फरशी फेकली. धोंडीबाचा फेटा उडून गेला होता. तो खुनाने बेभान झाला होता. लागोपाठ त्याने घाव घातले. दोन मिनीटात तुकाराम जमीनदोस्त झाला. धोंडीबाने प्रेत रक्ताच्या हाळयात भिरकटले. लाथ मारुन एक मातीचा ढिकळा त्या प्रेतावर कोसळला.



Scanned with CamScanner

काळ माणसाला नेहमीच आव्हान देत असतो. एक दिवस असा उगवला की, त्यानें धोंडीबाला आव्हान दिले. आणि म्हादू पाटलालाही दिले.

सकाळीच धोंडीबा पाटलांच्या निघाला. कधी नाही ते पाटील सकाळीच उठून बसले होते. तंबाखूला चूना लावून त्यानी तोंडात टाकला. तसा धोंडीबा दारात दिसला. त्यांनी धोंडीबाला जवळ बोलावले. व म्हणाले ' काय धोंडीबा काम फत्ते झालं का न्हाय '.

' असला मरद असताना कामं कस व्हनं नाय. तेला पाठवूनच आलोय. यमाच्या दारात ' धोंडीबा मिशीवर पिळ देत म्हणाला.

' आरं धोंड्या, जरा हळू बोल, कोण तरी ऐकेल आणि ही बातमी पोलीसात कळली म्हणी' म्हादू पाटील म्हणाला. तसा धोंडीबा चरकला.

' आवं पाटील रातीची बातमी इतक्यात कशी समजली हे इपरीत कुणी सांगीतलं. पाटील माझं बक्षिस देवा म्हणजें मी मोकळां झालो. पोलीसाचा बा आला तरी मी सांपडणार न्हाय. आताच जातो डोंगरात ' धोंडीबा म्हणाला.

' मी काय कुठ जाणार हाय व्हय. दिन की उद्या-परवा ' म्हादू पाटील म्हणाला.

धोंडीबा दररोज मागत होता. आणि पाटील त्याला हाकून देत होते. एक दिवस धोंडीबाची बायको म्हणाली आज उपाशीच न्हावू का ? जावा पाटलाकडं व थोडं दानं आना म्हणून धोंडीबा पाटलाकडे गेला आणि म्हणाला. पाटीलं बायको आणि मी उपाशीच हाय. तवं थोडं पाटील संतापून उठला धोंड्या, बेरडा, जा. चालता हो पुढं, जास्त बोललास तर पोलीसांना बलवून पकडून दीन. धोंडीबाची तळ-पायाची आग मस्तकाला भिडली. त्या दिवशी त्यानें व त्याच्या बायकोने पाण्यावरच भूक भागविली.

रात्रभर धोंडीबा या कुशीवरुन त्या कुशीवर लोळत पडला होता. त्याला झोप येत नव्हती. पाटलांच्या शेतावर तो जात नव्हता. धोंडीबा मध्येच उठला. फरशी घेतली आणि धार काढू काढला. त्याचे चित्तं थाऱ्यावर नव्हते. तसाच तो उठला आणि फरशी पिस्तूल घेऊन घराबाहेर पडला. कुठ जात आहे याचा त्याला पत्ता नव्हता. पाय जिकडे खेचतील तिकडे तो जाऊ लागला. आज चार दिवस तो उपाशी होता. अर्धपोटी राहीला होता. म्हादू पाटलाने त्याला कांहीच दिले नव्हते. अपमान करून पाठविले होते. इतक्या दिवसाची भूक तो शांत करणार होता. विचाराच्या तंद्रीत तो झपाझप चालत होता. वाट सपासप पाठीमागे जात होती. क्षणा-क्षणाला पाटलांचा मळा जवळ येत होता. थोड्याच वेळात तो पाटलाच्या मळ्याजवळ गेला. त्याला आता राखण करायची नव्हती. चोरी करायची होती. पाटलांचे कुत्रे जागे होते पण धोंडीबाची ओळख होती. ते शेपटीं हालवत धोंडीबा जवळ आले. धोंडीबाने जीवाची पर्वा न करता मळ्यावर झडप घातली. आणि घोंगड्याची खोळ भरेपर्यंत कणसे मोडली. घोंगड्याची खोळ पाठी-वर घेतली जाता जाता तिथले एक बकरे सुद्धा घेतले. आणि झपाझप पावले टाकीत तो घरी आला. शेवंती झोपली होती. रात्रीचा दीड वाजला होता. धोंडीबा घरी आला. त्याने शेवंताला उठवले. चूल पेटवली. आज पंधरा दिवसानी त्यांच्या झोपडीच्या छपरातून धूर वर येत होता.

पहाटे पाटलानी हाक मारली. ' धोंडीबा हाय का घरात '

' येरवाळीचं येणं केलसा पाटील ' धोंडीबा पुढं होऊन म्हणाला, व तंबाकूची गुळी थुंकून म्हणाला ' गरीबाच्या घरांत आजचं आलाय, बसा की वाईच '



Scanned with CamScanner

' धोंड्या, मी बसोस येवोस न्हाय. तुझ घर तपासायचं मला '

' व्हय. खरं! ते झाल तरी काय ? धोंडीबा म्हणाला.

" ते तुला मानं समजेलचं की." पाटील गुरगुरीत म्हणाला. ' धोंड्या? राती तू माझ्या मळ्यात गेला व्हतास का न्हाई? कणसं आणि बकर गेलेलं हाय. तुझ्या शिवाय कुणीच न्हेवूस न्हाय.'

' न्हाई पाटील, मी चोरी केली न्हाई. मी राती इथचं झोपलो व्हतो. इच्चारा माझ्या बायकोस. देवा शपथ पाटील, मी चोरी कराय न्हाय. धोंडीबा म्हणाला.

' आरं धोंड्या चोरी करतोस आणि वर देवाची शपत सांगतोस, बघतोच की, ' म्हणून पाटलाने सर्व घर तपासायला सुरवात केली. एका गाडग्यात कणसं एका गाडग्यात मटण सापडलं, तसा पाटील भडकून उठला.

' धोंड्या लेका, बेरड तो बेरड. चोरी करून वर न्हाई म्हनून मला सांगतोस. हे मटण आणि ही कणसं कुठली ? सांग नायतर गोळी घालून ठार मारीन. तुला जिवंत सोडणार न्हाय ! ' धोंडीबा खाली मान घालून बसला होता. त्याच्या तोंडातून शब्दच निघत नव्हता. तेव्हा त्याची बायको शेवंती म्हणाली," माफ करा पाटील चूक झाली पोटासाठी चोरी केली. " तसा पाटील भडकून उठला. ' धोंड्या, तुला आता गोळी घालतो. ' शेवंती नको नको म्हणू लागली. त्याचे पाय धरू लागली. पण म्हादू पाटलाने लाथेनेच तिला ढकलले. तशी शेवंती भितीवर आपटली. तिच्या कपाळातून रक्ताचे ओघळ वाहू लागले. धोंडीबाने ते पाहिले आणि त्याच्यातला राक्षस जागा झाला. त्याने बायकोच्या रक्ताचा टिळा आपल्या कपाळी लावून घेतला. आणि म्हणाला. " गरीबाची मान मोडणाऱ्या राकूसा, तुला मी आता जिवंत ठेवत न्हाई." तशाही परिस्थितीत शेवंता त्याला बिलगली आणि हुंदके देऊन रडू लागली.

त्या दिवसापासून धोंडीबा अधिकच बिघडला होता. चोऱ्या, दरोडे घालीत होता. तेवढ्या भागात त्याने हाहा:कार उडवून टाकला होता.

आमावस्याची ती काळोखी रात्र होती. काळाकुट्ट अंधार पसरलेला होता. रात्र मांजराच्या पावलाने पुढे सरकत होती. गावातील कुत्री सुद्धा हूं की चूं करीत नव्हती. अशा वेळी गावात एक व्यक्ती फिरत होती. रात्रीचे १२ वाजले होते. त्या व्यक्तिने हळूच कानोसा घेतला. सारा गाव शांत झोपी गेला होता. ती व्यक्ति हळूच पाटलाच्या वाड्यासमोर आली. पाठीमागच्या बाजूने तिने प्रवेश केला. हळूच दुसरा मजला गाठला' एका खोलीत त्याने प्रवेश केला. तेथे म्हादू पाटील डोके ठेऊन शांत झोपला होता. त्या व्यक्तिने फरशीची धार चापसून पाहिली. आणि क्षणाचाही विलंब न लावता म्हादू पाटलावर घाव घातला. ' आई ग '! अशी एकच हाक त्याच्या तोंडून बाहेर पडली.

धोंडीबा जीवनाच्या महासागरात एखाद्या ओंडक्याप्रमाणे तरंगत होता. त्याला किनारा सांपडत नव्हता. जायचे कुठे हे त्याला माहीत नव्हते.

आपल्यावर झालेल्या अन्यायाचा त्याने ' बदला ' घेतला होता. आता कोर्टाची पायरी त्याला बोलवत होती. फास दिसत होता.



# ‘भारुड’ कार संत एकनाथ

रंजना बेकनाळकर
तृतीय वर्ष साहित्य

नामदेवांच्या अस्तानंतर मराठी साहित्याच्या नभोमंडळात गुणगौरवाने चमकणारा तेजःपुंज तारा म्हणजे एकनाथ होय. एकनाथ साहित्याच्या क्षितीजावर चमकू लागले ते १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात. एकनाथांचा जन्म शके १४५० त पुण्यपावन अशा घराण्यात झाला. ज्यांनी विजयनगरहून श्री विठ्ठलाची पालखी, मूर्ती आणली त्या सुप्रसिद्ध भानुदासाचे पणतू होय. भगवद्भक्ति त्यांच्या घराण्यांत पूर्वीपासून चालत आलेली.

आमुचिये घरी पंढरीचा नेम ।
मुखी सुद्धा नाम विठ्ठलाचे ॥
भानुदास म्हणे, उपदेश आम्हा ।
जोडीला परमार्थ श्रीराम हा ॥

नाथांचे माता पिता बालपणीच स्वर्गवासी झाले. व अनाथ झालेल्या बालकाच्या पालनपोषणाची जबाबदारी आजा आजीवर येऊन पडली, एकनाथ कालीन समाजस्थिती अतिशय वाईट होती. मुसलमानी आक्रमणाने आपली बंधने महाराष्ट्राभोवती आवळून महाराष्ट्रीय संस्कृती आणि मराठीबाणा यांची गळपेची सुरु केली होती. हिंदूची देवळे नष्ट होत होती. या इस्लामी राजवटीला न दुखावता स्वराज्य व स्वभाषा यांचा योग्य तो अभिमान बाळगून हिंदू धर्म मराठी भाषा जतन जेणेकरून होईल अशा विचारसरणीचा प्रसार करण्याची नाजूक कामगिरी नाथापुढे उभी होती. आणि ती त्यांनी मोठ्या कौशल्याने संभाळली असे त्यांची ग्रंथसंपत्ती सांगत आहे.

वैदिक परंपरेच्या माहेरघरी, पैठणाला नाथांचे वास्तव्य होते. वैदिक परंपरेचा अभिमान, ब्राम्हणांचा कैवार, संस्कृत विद्येबद्दलचा असीम आदर व लिहिण्या-बोलण्यात पांडित्याचा डौल या गोष्टी पैठणच्या संस्कारांनी नाथांच्या ठिकाणी आल्या. ज्ञानेश्वरांचा वारकरीपंथ व पैठणाची वैदिक परंपरा या दुहेरी संस्कारामुळेच अनेक गोष्टींना मेळ घालणारी समन्वय बुद्धी त्यांच्या अंगी बाणलेली दिसते. प्रेमळपणा, सौजन्य व शांती आणि उदारपणा या वृत्तीविशेषांची आदर्शमूर्ती म्हणजेच एकनाथ होत. त्यांनी आपल्या उदारचरित्र व विशुद्ध चारित्र्य यांच्या बळावर अलौकीक कर्तृत्वकरून दाखविले' वारकरी पंथाच्या तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारतील आदर्श म्हणजेच नाथांचे चरित्र व चारित्र्य. प्रचंड ग्रंथ लेखनाच्या व किर्तन, पुराण प्रवचनाच्या द्वारा सतत भागवत धर्मांचा प्रचार करून वैदिक धर्म व धर्मभाषा यावर ओढवलेल्या संकटाचें निवारण करण्याचा मार्ग त्यांनी दाखविला. आणि आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धारही केला. त्या दृष्टीने समन्वय बुद्धीचे आदर्श सुधारक व महाराष्ट्रातील उदार मतवादाचे जनक होय नाथांची वैशिष्ठपूर्ण भूमिका होय.

प्राकृतात ग्रंथरचना करण्याची ज्ञानेश्वरापासून चालत आलेली परंपरा नाथांनीही पुढे चालविली आहे. नाथाने आपले विचार व्यक्त करण्यासाठी विविध पद्धतीची योजना केली. पंडीत व विद्वानासाठी चतुश्लोकी भागवत आणि एकनाथी भागवताचे लेखन केले. मध्यम वर्गीयासाठी ‘ रुक्मिणी स्वयंवर ’ आणि भावार्थ रामायणाची योजना केली व सर्वसामान्यासाठी भारुडाची



Scanned with CamScanner

निर्मिती केली आहे. ज्ञानेशांच्या शिकवणीला उजाळा देऊन त्या विविध मार्गांनी उच्चवर्णियांपासून कनिष्ठ–वर्गापर्यंत पोहोचविण्याचे कार्य नाथांनी केले. तत्वज्ञान लोकभाषेत सांगून जनरंजन करता करता लोकशिक्षण देणारे हे पहिले कवी. ग्रंथ, भारुडे, अभंग, पदे आणि गौळणी मिळून नाथांची कविता सुमारे पाऊण लाख भरते. मधल्या ३०० वर्षांच्या काळात ज्ञानेश्वरीत अनेक अपपाठ शिरले होते. ज्ञानेशांचे समाधीस्थान नामशेष झाले होते, पाठांतरी शुद्धाशुद्ध झालेल्या ज्ञाने–श्वरीच्या समाधीचा ' जीर्णोद्धार अशी महत्वाची दोन कार्ये केली '

तीर्थयात्रा करीत असताना पंचवटीस गुरु जनार्दन स्वामी यांच्या आज्ञेने नाथांनी चतु:श्लोकी भागवत लिहीले. हा त्यांचा पहिलाच ग्रंथ होय. ' सर्वभूती भगवद्‌भाव हीच माझी मुख्य भक्ति ' असा भागवत संप्रदायाचा संदेश यातून नाथांनी दिला आहे. एकनाथी भागवतात अनेक ठिकाणी गुरुविषयीचा आपला पूज्यभाव त्यांनी व्यक्त केला. रुक्मिणी स्वयंवर हे नाथांचे आख्यान काव्य. भावार्थ रामायण हा नाथांचा अखेरचा ग्रंथ, तसेच स्फुटप्रकरणेही आहेत. विद्वानासाठी आणि सर्वसामान्या–प्रौढ आणि आख्यान स्वरूपाची रचना केल्यानंतर बहुजनासाठी त्यांना समजेल रूचेल, पटेल अशी रचना करणे हाही नाथांचा हेतू होता. त्यासाठी त्यांनी समाजात रूढ असणाऱ्या अशा भारुडातून काही रचना केली. बहुजनाच्या नित्याच्याच जीवनातील, संसारातील व्यवहारातील दाखले देऊन त्यांनी समाजाला भक्ति रसाचे घुटके पाजले. तत्कालीन समाजात नित्य आढळ–णाऱ्या ज्योतिषी, कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, गारुडी, वैदू, दरवेशी., फकीर, वासुदेव, जोशी, सटवाई या देवताही त्यांना चांगल्या माहीत होत्या. त्या लोकांचे आचार विचार, व्यवसाय, भाषा यांचा आधार घेऊन नाथांनी ही भारुडे रचली. ही भारुडे म्हणजे नाथ–कालीन लोकजीवनाचे आणि लोकसाहित्याचे प्रकट दर्शन होय.

' मी परात्पर जोशी । होरा सांगेन संत सभेशी '

अशी आपली ओळख करून देतो. ' दार उघड बया दार उघड '

या भारुडाने नाथांनी जगदंबेला आवाहन केले आहे. नाथांचा ' जागला ' तर

" उठा की जी माय बाप कैसी लागली झोप ।
हुजूर जावूनीया तेवढी चुकवा झेप । "

असा पुकारा करतो. या .निमीत्ताने नाथांनी समाज–जीवनातील काही सुंदर चित्रे रेखाटली आहेत व त्यातून अध्यात्माचा धागा गुंफला आहे.

" मोडकेसे घर तूटकेसे छप्पर । देवाला देवघर नाही ।
मला दादला नको ग बाई । "

हे भारुड आजही लोकप्रिय आहे. ' सासुरवास ' या भारुडातून सून आपला आपला सासरा (अहंकार) आणि सासु (कल्पना) यांच्या सासूरवासास कंटाळून गावी गेलेला सासरा तिकडेच खपू देत आणि सासूला मरिआई येऊ देत अशी इच्छा करते. काम क्रोध रुपी विंचू चावल्याने झालेल्या वेदना ' विंचू ' या भारुडातून वर्णिल्या असून-

' मनुष्य इंगळी अति दारुण ' असा जोरदार फटका मारला आहे. दर आठ दिवसाला पुरणाची पोळी खाऊनही ' बाई मी भोळी ' असे म्हणणाऱ्या स्त्रीचे चित्र म्हणजे नाथांच्या मनुष्य स्वभावाच्या निरी–क्षणाचा सबळ पुरावाच होय.

जोहार मायबाप जोहार । मी विठू पाटलांचा महार ।

या भारुडातून नाथ लाच खावू नये, ईमान सोडू नये, भक्तिमार्ग खंडू नये अशी नीती शिकवतात तर थट्टा या भारुडातून –

' अशी ही थट्टा । भल्या भल्याशी लाविला बट्टा । '

असा उपदेश करतात.

अशी ही नाथांची भारुड रचना बहुविध स्वरुपाची आहे. त्यातून लोकांच्या भाषेत लोकजीवनातील उदा-हरणे देवून नाथांनी अध्यात्म शिकविले आहे. मनोरंजना-तून परमार्थाची भाषा शिकविली आहे. त्यामुळे ' लोक-साहित्यकार ' एकनाथ असे नाथांचे वर्णन करावे लागेल. भारुड विश्वात शृंगार, विनोद. मानवी स्वभावातील विविधता व यातून सोपे अध्यात्म निवेदन ही वैशिष्ट्ये आढळतात. नाथकालीन समाज जीवनाचे म्हणजे चालीरीती, सणवार, कुटुंबव्यवस्था, ग्रामीणजीवन, समाजव्यवस्था, इ. चे दर्शन भारुडे घडवितात अशी सुमारे ३०० भारुडे आहेत. नाथाच्या व्यक्तिगत, पारमार्थिक अनुभवाचे दर्शन या अभंगातून घडले आहे.

' दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हरपले मन झाले उन्मन '
ही नाथकृत दत्तात्रयाची आरती प्रख्यातच आहे.

अशी आहे नाथाची साहित्य संपदा. ती अष्टपैलू आहे. भागवतासारखे प्रबंध, नाथांचे रामायण आणि रुक्मिणीस्वयंवरासारखी रसाळ आख्यानक काव्ये, संत आणि भक्त चरित्रे, पदे, गौळणी अभंग, भारुडे आणि स्फुट-गद्य हे लिहिले अष्टपैलू होते. एकाच विविधपूर्ण कार्यातील फक्त नाथांचीच. मंदिराच्या प्रकाशापासून वंचितांच्या बहुजनांची भक्तीची वाट नाथांनी उघड केली. लोकांत विवेकाचा सडा घातला. सामाजिक नीती आणि मानवतेचे वृक्ष लावले. आत्मज्ञान आणि गुरुसेवेच्या दीपांनी सारा रस्ता उजळून टाकला. ज्ञानेश्वरांनंतर सुमारे ३०० वर्षांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्याचे कार्य नाथांनी केले. बहिणा-बाईंनीही भागवत मंदिराचे चित्र रेखाटताना

" जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवत "

असे श्रेय एकनाथांना दिले आहे.

**सत्य वर्तन :-**

आपल्या सर्वांच्या निर्मात्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांना उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे. आणि त्यांस आपापसात सारख्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे. सर्वांच्या निर्माण कर्त्याने एकंदर सर्व स्त्रियांस व पुरुषास एकंदर सर्व मानवी हक्कांविषयी आपल्यास पाहिजे तशी मते बोलून दाख-विण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु या विचारापासून कोणत्याहि प्रकारे नुकसान मात्र होऊ नये अशी खबरदारी ठेवावी. त्यास सत्य वर्तन म्हणतात.

म. ज्योतीबा फुले



Scanned with CamScanner

# क्रांतिसिंह नाना पाटील :–

कुमारी एस. जी. धुमे
पदवी पूर्व साहित्य

सातारा जिल्ह्याचे वर्णन करताना 'क्रांतिकारकांची खाण' या शब्दांचाच उल्लेख केला जातो. याच जिल्ह्यात क्रांतिकारक नररत्न नाना पाटील यांचा जन्म झाला यात नवल ते काय वाटणार ? नाना पाटील यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील येडेमच्छिंद्र या गावी झाला. त्यांचे घराणे वारकरी पंथाचे असल्याने बाराव्या दिवशीच त्यांच्या गळयात माळ घातली गेली. त्यामुळे पोथी पुराण वाचनाचा नाद लागला व अभ्यासाकडे कमी लक्ष पुरविल्यामुळे त्यांना फक्त शालांत परीक्षा पास होता आले. सर्व पदव्या मिळाल्यामुळेच माणसाची विद्वत्ता वाढते असे काहीच नाही. नाना पाटलांच्यावरून सर्व पदव्या ओवाळून टाकल्या तरी त्या त्यांच्या विद्वतेची बरोबरी करू शकणार नाहीत.

कुठल्याही प्रकारची चळवळ यशस्वी करावयाची असेल तर जे मनोधैर्य, बलीदान लागते ते शेतकरी कामगार यांच्याच थरातून येते याचे समर्पक उदाहरण म्हणून चटकन आपल्या जिव्हेवर नाना पाटील यांचेच नाव येते. १९४२ च्या राष्ट्रीय लढ्यामध्ये 'जिंकू किंवा मरू' या मंत्राचा घोष करून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यानी प्राणांची आहुती दिली, त्या हजारो तरुणांना मार्ग दर्शन करण्याचे काम नाना पाटील यांनीच केले होते. नाना पाटील यांच्या लढाऊ जीवनाकडे पाहिले असता त्यांच्या जीवनात व आपल्या जीवनात जमीन अस्मानाइतके अंतर पडते व त्यांच्या व्यक्तिमत्वातील कांही अंशी त्यांचे गुण आपल्या अंगी बाणवून घेवू का ? असा प्रश्न आपल्या मनात आल्यावाचून राहात नाही. कोणत्याही प्रकारच्या हालअपेष्टा सोसून चळवळ यशस्वी करणे हा त्यांचा बाणा असल्यामुळेच हा मराठी मातेचा पुत्र सर्वांच्याच गळयातील ताईत बनला. स्वातंत्र्य आंदोलनाच्यावेळी अक्षरशः लोखंडाचे चणे खाऊन दिवस काढलेल्या त्या क्रांतिवीराचे आपण सदैव ऋणी आहोत.

क्रांतिसिंह नाना पाटील म्हणजे त्याग, कष्ट, हालअपेष्टा यांची ज्वलंत मूर्ती होय. आपल्या समोर जे कांही ध्येय असेल ते गाठणे हा गुण त्यांच्यात जात्याच असल्यामुळे त्यांच्याकडे आपण एक ध्येयवेडे जीवित म्हणून पहातो. आज आपण सर्वांनी त्यांच्या समर्पित जीवनापासून स्फूर्ती व बोध घेवून आपले जीवन घडविण्याचा प्रयत्न केला तरच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या आत्म्याला चिरंतन सात्विक समाधान लाभेल.

नाना पाटील अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे नेते होते. ज्याप्रमाणे तुकाराम महाराजानी गरीब, अज्ञान जनतेला सरळ सोप्या भाषेत परमार्थाचा मार्ग सांगितला, त्याचप्रमाणे नाना पाटील यांनी सामान्य लोकांची आर्थिक समस्या सोडवून दैनंदिन जीवन त्रासातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला.



Scanned with CamScanner

एका रगगांडच्या शाहीराने नानांना श्रद्धांजली, वाहताना नानांचे चातुर्य, धूर्तपणा, आचाट साहस यांचे वर्णन करताना म्हटले आहे –

लई धूर्त म्हणती नाना पाटील याला
कित्येक समयी त्याने पोलीसास फसविला
पोलीस सिद्ध होते त्यास पकडावया
परंतू पोलीसांचे सारे प्रयत्न गेले वाया हा जी जी ऽऽ

नानावर सरकारचा पकड वारंट आला
घराघरांवर पोलीसांनी छापा घातला
पण तो सर्वांचा लाडका होता नेता
म्हणून जनतेने त्यास लपविला होता हा जी जी ऽऽ

पोलीसानी एका घरावर छापा घातला
त्या घरात होता सर्वांचा आक्रोश चालला
कारण त्यांच्यात कोणाचा तरी प्राण गेला
प्रेत नेईपर्यंत थांबावे लागले पोलीसाना हा जी जी ऽऽ

त्याच घरात होते नाना लपलेले
प्रसंगावधान राखून ते प्रेत बनले
तिरडीवरुन त्यांना नदी वेशीला नेले
तेथून ते पलायन करते झाले हा जी जी ऽऽ

❊ ❊

**'हाय ब्रीड'**

खरे तर आज कोणच शुद्ध जातीचा नाही. प्रत्येक जातीत, रक्तात, संकर झालेला आहे. ४–६ पीढीनंतर एकदा तरी रक्त संकर होणे आवश्यक आहे. नाही तर 'जीवा' त व्यंग निर्माण होते. आपण सर्व शुद्ध, बळकट, अव्यंग आहोत. याचा अर्थ काय होतो? केव्हांतरी आपल्या पूर्वी जाती जातीत घोटाळा झाला आहे! "आपल्या पूर्वजापैकी कोणीही मिश्रविवाह केला नाही, असे छातीठोकपणें कोण सांगू शकेल काय?"

डॉ. इरावती कर्वे.

**स्वातंत्र्य आणि शिक्षण :**

"स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परका झेंडा आपण क्षणभरही ठेवला नाही, तत्काळ तो काढून आपण स्वतंत्र भारताचा झेंडा फडकावला- त्याप्रमाणे पारतंत्र्यातील शिक्षणपद्धती आपण क्षणभरही चालू द्यायला नको होती!'



Scanned with CamScanner

# आजच्या शिक्षणातील धोके !

सिद्दापा धनगर
B. A. III

"शिक्षण म्हणजे जीवन... ज्ञान एक मार्गदर्शक ... ज्ञान एक अमृत ... शिक्षण – एक जीवनाचे अभिन्न अंग असे कोठेतरी वाचल्याचे आठवते. आणि मन मग भावपूर्ण अवस्थेत आजच्या शिक्षणातील वन्यावाईटाकडे जाते. इ. स. १८१८ ला पुणे येथील शनिवार वाड्यातील मराठ्यांचा भगवा झेंडा उतरवला गेला आणि इंग्रजांनी युनियन जॅक फडफडले. संपूर्ण भारत इंग्रजांच्या ताब्यात गेला आणि एतद्देशीय हिंदू लोकावर इंग्रजांचें राज्य सुरु झाले. इंग्रज एक प्रगत सुधारणावादी संस्कृतीचे प्रतीक होते. यांत्रिक सुधारणा, वैज्ञानिक संशोधन, सामाजिक आचार–विचार, शिक्षण, सांस्कृतिक धनविद्या यावावत एतद्देशीय समाजात उलथापालथ होण्यास सुरवात झाली. यामुळे आम्ही इंग्रजांचे विचार, संस्कृती, पोशाख, चालीरीती सारे सारे उचलले. आमचा देश, आमची संस्कृती. आमचा धर्म, आमची भाषा या सर्वाचा विसर पडला. आम्ही 'इंग्रजाळलो'.

एका माणसाला किती भाषा शिकणे शक्य आहे? आज सारे जग जवळ येत चालले आहे. राष्ट्राराष्ट्रात वैज्ञानिक स्पर्धा चालू आहेत. प्रत्येक राष्ट्र आपल्या उत्कर्षाच्या नादी लागले आहे. तेव्हा अनेक राष्ट्रांशी आपला संबंध येतो. या राष्ट्राशी व्यवहार करणे म्हणजे त्या त्या राष्ट्राची भाषा येणे आवश्यक आहे. जीवन–संघर्षात टिकून रहावयाचे असेल तर सर्व भाषा अवगत असणे आवश्यक आहे. प्रश्न असा की हे सर्व शक्य आहे काय? भारतात आज १४ प्रमुख भाषा आहेत. भाषावार प्रांतरचना झालेली आहे. त्या त्या भाषेत विद्यापीठे आहेत. तेव्हा बहुजन समाजातल्या एका माणसाला या सर्व भाषा येणे कठीण आहे. बहुजन समाजाचा उत्कर्ष व्हायचा असेल तर त्याच्या भाषेतुनच त्याचा उत्कर्ष होईल. तेव्हा बहुजनसमाजाची जो भाषा–मातृभाषा तिचे सामर्थ्य वाढवणे आवश्यक आहे.

शाळांतून इंग्रजीची सक्ती आहे. गेली १५४ वर्षे ही सक्ती चालू आहे हा पहिला धोका. बहुजन–समाजातल्या विद्यार्थ्यांचे या भाषासक्तिमुळे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांची बौद्धीक वाढ होऊ शकली नाही. 'इंग्रजी' म्हटले की तो घाबरतो. एस. एस. सी. ला इंग्रजी घेऊन बसणाऱ्यांची संख्या दिवसे दिवस घटत चाललेली आहे. संस्कृत विषयाची उत्तरे इंग्रजी तुन लिहावी लागतात. इतर विषयात मार्क्स भरपुर. इंग्रजीत नापास असा सर्रास प्रकार चालू आहे.

आज शिक्षणाला बाजारी स्वरूप आले आहे. मुंबईसारख्या शहरात तर अपुऱ्या जागेमुळे शाळा दुवक्त भरतात- या शाळांच्या वेळा मानस शास्त्रीय–दृष्ट्या अगदी सदोष आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष लागत नाही. पूर्वीच्या काळी गुरुकुल पद्धती असल्याने विद्यार्थी गुरुगृही राहात त्यामुळे गुरु आणि विद्यार्थी यांचा प्रत्यक्ष संबंध येत असे. आज एकेका वर्गात पन्नास पन्नास विद्यार्थी. त्यामुळे शिक्षकाला विद्यार्थ्यांकडे लक्ष देता येत नाही, हा दुसरा धोका.



Scanned with CamScanner

अनेक शाळांना स्वतंत्र इमारती नाहीत. आणि ज्या शाळांना स्वताच्या इमारती आहेत- त्या सुद्धा भरवस्तीत. त्यामुळे वर्गांत तास चालू असतो आणि अशावेळी बाजूच्या हॉटेलांत रेडिओवर सिने संगीत लागते, त्यामुळे इच्छा असूनही मुलांचे लक्ष अभ्यासात लागत नाही. या शाळा भरवस्तीत असल्याने इतर आवाज, वाहनांचा खडखडाट इ. त्रास चालूच असतो. जागा पुरत नसते, हवा मोकळी मिळत नाही आणि स्वच्छंद खेळावयास क्रीडागंणही नसते हा तिसरा धोका.

आजच्या शिक्षणातील शालेय अभ्यासक्रमात अनेक विषय असल्याने 'एक ना धड भाराभर चिंध्या' असा प्रकार होतो. विद्यार्थ्यांचा एखादा विषय आवडता असतो परंतु त्याला इतरही विषय करावे लागतात. आणि या सर्व विषयांवर त्याचे यशापयश अवघ्या तीन तासात ठरते. विद्यार्थ्याच्या पालकाकडून शाळेची फी मिळते. त्या शिवाय त्यांना इतर कांहीही कष्ट करावे लागत नाहीत. म्हणून त्याला शिक्षणाची किंमत वाटत नाही. शिक्षकाचा सहवास त्याला फार मोठा मिळत असल्याने त्याला गुरुविषयी आदर वाटत नाही हा मोठा धोका.

आजच्या शिक्षणाचा प्रमुख दोष म्हणजे आजचा विद्यार्थी वर्ग हा बेशिस्त आहे. रशियांतून आलेल्या परक्या पाहुण्यांचा सत्कार करण्याकरिता सभा भरली होती. एक रशियन पाहुणा, भाषण करीत असताना कोणातरी विद्यार्थ्याला कुचाळकी करण्याची लहर आली आणि त्याने बकरीसारखा आवाज काढला. सर्वत्र हंशा पिकला. यामुळे रशियन पाहूणे चिडले. सभा बरखास्त झाली. दुसऱ्या दिवशीं सर्व वृत्तपत्रांत विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची वार्ता प्रसिद्ध झाली. हे पुढचे धोके.

खरोखरच आजचा विद्यार्थी बेशिस्त आहे. का? त्याचे वर्तन तपासले पाहिजे. आजचा विद्यार्थी आपला जास्त वेळ राजेश खन्ना कडे घालवितो. विद्या मिळविणे ज्ञानामृत पिणे, या पेक्षा परीक्षा पास होणे हे त्याचे ध्येय असते. त्याला शाळेतील गुरुजनांविषयी आदर नाही. तो त्यांची कुचाळकी करतो. आणि शिक्षकांशी टिंगल करणारा विद्यार्थी आजच्या विद्यार्थी वर्गात 'हिरो' ठरतो. 'मी' श्रेष्ठ की 'तू' श्रेष्ठ या स्वार्थी- पणाचा उपयोग आजच्या शिक्षणात होत असल्याने शिक्षणात गचाळपणा निर्माण झालेला आहे.

राजकारण हे ही शिक्षणात एक धोका निर्माण करत आले आहे. आजच्या शिक्षणात राजकारण असल्याने शिक्षण हे 'शिक्षण' राहिलेले नाही.

विद्यार्थी राजकारणात अकाली आस्था दाखवितात आणि देशातील चमत्कारिक परिणाम भोगतात. शिक्षणावरसुद्धा परिणाम होत असून आजची शिक्षण पद्धती 'बेकार' म्हणून संबोधली जाते. विद्यार्थी राजकारणात अकाली लक्ष घालतात त्यामुळे त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देणे जरूर आहे. राजकारणामुळे नि:संकोचपणे चर्चा करण्याची संधी शिक्षणाच्या क्षेत्रात मिळत नाही. दुष्ट प्रवृतीचा समावेश यामुळे शिक्षणाची किंमत उरलेली नाही. यामुळे जर गरीब, बहुजन समाजाला फार मोठा धक्का बसून, शिक्षणातील बेशिस्तीमुळे ते शिक्षणापासून परावृत्त होतात. शिक्ष- णाच्या पवित्र मंदिरात असले धोके आजच्या शिक्षणात पहावयास मिळतात.

विद्यार्थी हा आजच्या शिक्षणपद्धतीतील प्रमुख केंद्र आहे. त्याच्या सर्वांगीण विकासाला महत्व दिले गेले आहे. विद्यार्थ्यांच्यातील सुप्त कलांचा विकासही त्यात साधला जातो. परंतु सद्य:कालीन परिस्थितीमुळे शिक्षणात आलेले दोष टाळण्याकरिता शिक्षणात अमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. त्यात विद्यार्थ्यांचे आणि राष्ट्राचेही हित आहे.



Scanned with CamScanner

# आजच्या शिक्षणातील धोके !

सिद्दापा धनगर
B. A. III

“ शिक्षण म्हणजे जीवन . . . ज्ञान एक मार्गदर्शक . . . ज्ञान एक अमृत . . . शिक्षण – एक जीवनाचे अभिन्न अंग असे कोठेतरी वाचल्याचे आठवते. आणि मन मग भावपूर्ण अवस्थेत आजच्या शिक्षणातील बऱ्यावाईटाकडे जाते. इ. स. १८१८ ला पूणे येथील शनिवार वाड्यातील मराठ्यांचा भगवा झेंडा उतरवला गेला आणि इंग्रजांचे युनियन जॅक फडफडले. संपूर्ण भारत इंग्रजांच्या ताब्यात गेला आणि एतद्देशीय हिंदू लोकावर इंग्रजांचें राज्य सुरु झाले. इंग्रज एक प्रगत सुधारणावादी संस्कृतीचे प्रतीक होते. यांत्रिक सुधारणा, वैज्ञानिक संशोधन, सामाजिक आचार–विचार, शिक्षण, सांस्कृतिक धनविद्या याबाबत एतद्देशीय समाजात उलथापालथ होण्यास सुरवात झाली. यामुळे आम्ही इंग्रजांचे विचार, संस्कृती, पोशाख, चालीरीती सारे सारे उचलले. आमचा देश, आमची संस्कृती. आमचा धर्म, आमची भाषा या सर्वांचा विसर पडला. आम्ही ‘ इंग्रजाळलो ’.

एका माणसाला किती भाषा शिकणे शक्य आहे ? आज सारे जग जवळ येत चालले आहे. राष्ट्राराष्ट्रात वैज्ञानिक स्पर्धा चालू आहेत. प्रत्येक राष्ट्र आपल्या उत्कर्षाच्या नादी लागले आहे. तेव्हा अनेक राष्ट्रांशी आपला संबंध येतो. या राष्ट्राशी व्यवहार करणे म्हणजे त्या त्या राष्ट्राची भाषा येणे आवश्यक आहे. जीवन–संघर्षात टिकून रहावयाचे असेल तर सर्व भाषा अवगत असणे आवश्यक आहे. प्रश्न असा की हे सर्व शक्य आहे काय ? भारतात आज १४ प्रमुख भाषा आहेत. भाषावार प्रांतरचना झालेली आहे. त्या त्या भाषेत विद्यापीठे आहेत. तेव्हा बहुजन समाजातल्या एका माणसाला या सर्व भाषा येणे कठीण आहे. बहुजन समाजाचा उत्कर्ष व्हायचा असेल तर त्याच्या भाषेतूनच त्याचा उत्कर्ष होईल. तेव्हा बहुजनसमाजाची जी भाषा–मातृभाषा तिचे सामर्थ्य वाढवणे आवश्यक आहे.

शाळांतून इंग्रजीची सक्ती आहे. गेली १५४ वर्षे ही सक्ती चालू आहे हा पहिला धोका. बहुजन–समाजातल्या विद्यार्थ्यांचे या भाषासक्तिमुळे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांची बौद्धीक वाढ होऊ शकली नाही. ‘ इंग्रजी ’ म्हटले की तो घाबरतो. एस. एस. सी. ला इंग्रजी घेऊन बसणाऱ्यांची संख्या दिवसे दिवस घटत चाललेली आहे. संस्कृत विषयाची उत्तरे इंग्रजीतून लिहावी लागतात. इतर विषयात मार्क्स भरपूर, इंग्रजीत नापास असा सर्रास प्रकार चालू आहे.

आज शिक्षणाला बाजारी स्वरूप आले आहे. मुंबईसारख्या शहरात तर अपुऱ्या जागेमुळे शाळा दुवक्त भरतात- या शाळांच्या वेळा मानस शास्त्रीय–दृष्ट्या अगदी सदोष आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष लागत नाही. पूर्वीच्या काळी गुरुकुल पद्धती असल्याने विद्यार्थी गुरुगृही राहात त्यामुळे गुरु आणि विद्यार्थी यांचा प्रत्यक्ष संबंध येत असे. आज एकेका वर्गात पन्नास पन्नास विद्यार्थी. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे लक्ष देता येत नाही, हा दुसरा धोका.



Scanned with CamScanner

अनेक शाळांना स्वतंत्र इमारती नाहीत. आणि ज्या शाळांना स्वताच्या इमारती आहेत- त्या सुद्धा भरवस्तीत. त्यामुळे वर्गांत तास चालू असतो आणि अशावेळी बाजूच्या हॉटेलांत रेडिओवर सिने संगीत लागते, त्यामुळे इच्छा असूनही मुलांचे लक्ष अभ्यासात लागत नाही. या शाळा भरवस्तीत असल्याने इतर आवाज, वाहनांचा खडखडाट इ. त्रास चालूच असतो. जागा पुरत नसते, हवा मोकळी मिळत नाही आणि स्वच्छंद खेळावयास क्रीडागंणही नसते हा तिसरा धोका.

आजच्या शिक्षणातील शालेय अभ्यासक्रमात अनेक विषय असल्याने 'एक ना धड भाराभर चिंध्या' असा प्रकार होतो. विद्यार्थ्यांचा एखादा विषय आवडता असतो परंतु त्याला इतरही विषय करावे लागतात. आणि या सर्व विषयांवर त्याचे यशापयश अवघ्या तीन तासात ठरते. विद्यार्थ्याच्या पालकाकडून शाळेची फी मिळते. त्या शिवाय त्यांना इतर कांहीही कष्ट करावे लागत नाहीत. म्हणून त्याला शिक्षणाची किंमत वाटत नाही. शिक्षकाचा सहवास त्याला फार मोठा मिळत असल्याने त्याला गुरुविषयी आदर वाटत नाही हा मोठा धोका.

आजच्या शिक्षणाचा प्रमुख दोष म्हणजे आजचा विद्यार्थी वर्ग हा बेशिस्त आहे. रशियांतून आलेल्या परक्या पाहुण्यांचा सत्कार करण्याकरिता सभा भरली होती. एक रशियन पाहुणा, भाषण करीत असताना कोणातरी विद्यार्थ्याला कुचाळकी करण्याची लहर आली आणि त्याने बकरीसारखा आवाज काढला. सर्वत्र हंशा पिकला. यामुळे रशियन पाहूणे चिडले. सभा बरखास्त झाली. दुसऱ्या दिवशीं सर्व वृत्तपत्रांत विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची वार्ता प्रसिद्ध झाली. हे पुढचे धोके.

खरोखरच आजचा विद्यार्थी बेशिस्त आहे. का? त्याचे वर्तन तपासले पाहिजे. आजचा विद्यार्थी आपला जास्त वेळ राजेश खन्ना कडे घालवितो. विद्या मिळविणे ज्ञानामृत पिणे, या पेक्षा परीक्षा पास होणे हे त्याचे ध्येय असते. त्याला शाळेतील गुरुजनांविषयी आदर नाही. तो त्यांची कुचाळकी करतो. आणि शिक्षकांची टिंगल करणारा विद्यार्थी आजच्या विद्यार्थी वर्गात 'हिरो' ठरतो. 'मी' श्रेष्ठ की 'तू' श्रेष्ठ या स्वार्थी-पणाचा उपयोग आजच्या शिक्षणात होत असल्याने शिक्षणात गचाळपणा निर्माण झालेला आहे.

राजकारण हे ही शिक्षणात एक धोका निर्माण करत आले आहे. आजच्या शिक्षणात राजकारण असल्याने शिक्षण हे 'शिक्षण' राहिलेले नाही.

विद्यार्थी राजकारणात अकाली आस्था दाखवितात आणि देशातील चमत्कारिक परिणाम भोगतात. शिक्षणावरसुद्धा परिणाम होत असून आजची शिक्षण पद्धती 'बेकार' म्हणून संबोधली जाते. विद्यार्थी राजकारणात अकाली लक्ष घालतात त्यामुळे त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देणे जरूर आहे. राजकारणामुळे नि:संकोचपणे चर्चा करण्याची संधी शिक्षणाच्या क्षेत्रात मिळत नाही. दुष्ट प्रवृतीचा समावेश यामुळे शिक्षणाची किंमत उरलेली नाही. यामुळे जर गरीब, बहुजन समाजाला फार मोठा धक्का बसून, शिक्षणातील बेशिस्तीमुळे ते शिक्षणापासून परावृत्त होतात. शिक्षणाच्या पवित्र मंदिरात असले धोके आजच्या शिक्षणात पहावयास मिळतात.

विद्यार्थी हा आजच्या शिक्षणपद्धतीतील प्रमुख केंद्र आहे. त्याच्या सर्वांगीण विकासाला महत्व दिले गेले आहे. विद्यार्थ्यांच्यातील सुप्त कलांचा विकासही त्यात साधला जातो. परंतु सद्य:कालीन परिस्थितीमुळे शिक्षणात आलेले दोष टाळण्याकरिता शिक्षणात अमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. त्यात विद्यार्थ्यांचे आणि राष्ट्राचेही हित आहे.



Scanned with CamScanner

# बाईऽऽऽ

करिआप्पा खापरे
B. A. I

बाई या शब्दाचा अर्थ इतिहासकालात उच्च प्रकारचा तर वर्तमानकालात कनिष्ट प्रकारचा मानला जातो. पुराणकालामध्ये तो शब्दच नव्हता. पुराणकालातील स्त्रिया सीता, सावित्री, द्रौपदी, सुभद्रा इत्यादी घेतल्या तर त्यांना आपण आदरार्थी 'बाई' हे उपपद लावीत नाही. सीताबाईचे स्वयंवर झाले किंवा सावित्रीबाईने यमाचा पाठलाग केला असे आपण सहसा म्हणत नाही.

इतिहासकालातील विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहासातील प्रसिद्ध स्त्रियांचा निर्देश आपण 'बाई' हे उपपद लावूनच करतो. ते उपपद गाळले तर त्या ऐतिहासिक स्त्रीच्या अभिमान्यांना ते कसेसे वाटेल. उदाहरणार्थ अहिल्याबाई होळकर, ताराबाई, जिजाबाई, सोयराबाई, झांशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादी माननीय स्त्रियांचा उल्लेख बाई या उपपदाने अगदी परवा पर्यंत म्हणजे नजिकच्या वर्तमानकालातही होत होता. उदाहरणार्थ डॉ. आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे, सुभद्राबाई तारकुंडे, सारजाबाई बापट, पंडिता रमाबाई इ. इ.

पण पुढे 'बाई' या उपपदाची अवहेलना झाली. कशामुळे? घरकामाला ज्या स्त्रिया मोलकरीण म्हणून राहुन त्यांचा उल्लेख 'बाई' या नावाने होऊ लागला त्यामुळे मग नवीन तरूण मुली म्हणू लागल्या " मला 'राधाबाई' म्हणू नको ! मी काय भांडी घासणारी मोलकरीण आहे ?" मग बाई हे उपपद-विरहीत नांवे लावण्याची प्रथा सर्रास रुढ झाली. 'बाई' म्हटले तर अशुद्ध आणि अवघड वाटू लागले. अहिल्याबाई होळकर म्हटले तर चालत असता व साजरे दिसत असता, 'अहिल्याबाई रांगणेकर' हे मात्र कसेसे वाटू लागले.

आरंभ कोठून झाला. मला वाटते सुप्रसिद्ध कवी रेव्ह. नारायणराव टिळक यांची मानीव कन्या कवियत्री तारा टिळक हिच्यापासून, हिराबाई बडोदेकर यांच्या कालापर्यंत " बाई " उपपदाची प्रतिष्ठा टिकून होती. अद्यापही आपण " हिरा बडोदेकर " असे एकेरी म्हणत नाही. पण नंतरच्या गायिका मात्र एकेरी झाल्या. लता मंगेशकर, आशा भोसले, प्रभा अत्रे, किर्ती शिलेदार, जयमाला शिलेदार, उषा मंगेशकर इत्यादी लेखिकाही आपला निर्देश कटाक्षाने एकेरी करू लागल्या. उदाहरणार्थ दुर्गा भागवत, शकुंतला फाटक, ज्योत्स्ना देवधर, कुमुदिनी रांगणेकर, शांता शेळके, सरोजिनी बाबर, इंदिरा संत, विद्या बाळ, विजया काळे इत्यादी.

नंतर ऐतिहासिक स्त्रियांनाही त्यांच्या स्मरणार्थ संस्था उभारतांना 'बाई' हे उपपद लावणे बरे वाटेनासे झाले. आणि एकेरी उल्लेख देखील अवघड वाटू लागला. म्हणून " अहिल्याबाई हायस्कूल " म्हणवेना आणि " अहिल्या हायस्कूलही " म्हणवेना म्हणून मध्यम मार्ग काढला तो " अहिल्यादेवी हायस्कूल " असा. जिजा उद्यान म्हणणे कसेसे वाटू लागले आणि जिजाबाई उद्यान म्हणणेही युक्त वाटेना म्हणून मध्यम



Scanned with CamScanner

नावे " जिजामाता उद्यान " असा निघाला. झांशीच्या राणी लक्ष्मीबाईचे नाव संस्थाना देताना " राणी लक्ष्मी " मडळ असे रूप होऊ लागले. " बाई " उप–पदाला असे वळसे घालण्यात आले,

मग स्त्रियांच्या मनगटी घड्याळांना जसे लहान किंवा " मिनी " रुप आले किंवा पर्सेस अगर चोळ्यांच्या बाह्या आकसु लागल्या त्याप्रमाणे नावा–वरही कांही बाबतीत परिणाम झाले, म्हणून ' मृणालिनी गोरे ' नांव लांबलचक वाटून ' मृणाल गोरे हे नांव रुढावले ' सरोजिनी बोरकर ' असे नाव लिहिण्याच्या ऐवजी ' सरोज बोरकर ' असे रुप आले. ' सरोजिनी बाबर ' यानांही कदाचित ' सरोज बाबर ' असे नांव करण्याची लहर येण्याचा संभव.

पुरुष लेखकांनीही एक संकोच केला आहे. पूर्वी-पासून स्वतःच्या व पित्याच्या नावाची अद्याक्षरे व नंतर आडनांव लिहिण्याची प्रथा होती व अद्याप जुन्या लेखकात चालू आहे. पण नविन लेखकांनीही अद्या-क्षरी प्रथा सोडून दिली व स्वतःचे नावच तेवढे समग्र येऊ लागले. जसे अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, विद्याधर गोखले, प्रभाकर, माचवे, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, रमेश मंत्री, जयवंत दळवी इत्यादि स्त्रियांच्या बाबतीत बाई हे उपपद गेले तसेच पुरुषांच्या बाबतीतही ' राव ' किंवा ' पंत ' ही उपपदे संपुष्टात आली आहेत.

**

**काय ! आणि काय ?**

आपण काय खातो यापेक्षा काय पचवितो यावरच आपली शक्ति अवलंबून आहे.

आपण काय मिळवितो यापेक्षा काय शिल्लक ठेवतो यावर आपली खरी श्रीमंती अवलंबून आहे.

आपण काय वाचतो यापेक्षा काय लक्षात ठेवतो यावरच आपली खरी बुद्धीमत्ता अवलंबून आहे.

आणि आपण काय उपदेश करतो यापेक्षा काय आचरणात आणतो यावरच आपले चारित्र्य अवलंबून आहे.

**प्रेमाचं आयुष्य –**

एकमेकावर माया करा, प्रेम करु नका. प्रेम क्षणिक असते. माया अमर राहाते.



Scanned with CamScanner

# परिक्षा केंद्रावरील पंधरा मिनिटे –

मनोहर वा. जोशी (शिपूरकर)
M. A. I

परीक्षा केंद्रावर जाण्याचा योग प्रत्येकाला येतोच.

परीक्षा देण्याकरीता कांहीजण जातात. तर इतराना पोचविण्याकरिता कांहीजण जातात. तेथील वातावरण जरा वेगळेच असते. परीक्षा सुरु होण्यापूर्वी पंधरा–वीस मिनिटे फार महत्वाची असतात. त्यावेळी तेथे जाऊन आपणही एक त्यातील होण्याची इच्छा होते. आणि मग मी त्या परीक्षा केंद्राकडे वळलो. आता परीक्षेला १५ – २० मिनिटे राहीलेली असतात. वेळ भरत आल्यामुळे धावपळ चालू असते. परंतू मंडईतल्या धाव–पळीपेक्षा ही धावपळ वेगळी असते. त्यात गडबड, कल–कलाटनसतो. कितीही हुषार विद्यार्थी असला तरी हे आपल्याला आठवेल ना? लिहिता येईल ना? या भितीने विद्यार्थी बेजार झालेला असतो, आणि पुन्हा पुन्हा पुस्तके चाळीत असतो'

आज महाविद्यालयीन परीक्षा सुरु होणार होती. प्रत्येक विद्यार्थ्याने अनेक परीक्षा दिल्या. तरी केंद्रावर जाऊन परिक्षा देण्याची ही पहिलीच वेळ, त्यामुळे सर्व विद्यार्थी मनातून घाबरलेले होते. परंतु ते एकमेकाना धीर देत होते. इतक्यात परीक्षेची पहिली घंटा झाली.. अजून परीक्षा सुरु होण्यास १५ मिनिटे होती. तरी पण सर्वजण आपापल्या माणसांचे निरोप घेत होते, बरोबर आणलेली वह्या, पुस्तके त्यांच्या बरोबर देत होते. पेन, पेन्सील इत्यादी आपली सर्व शस्त्र साधने नीट आहेत की नाहीत हे अजमाऊन पहात होते. घरचे लोकही सूचना देत होते. "फी पावती आहे ना रे, पेपर नीट लिही. घाबरु नकोस" विद्यार्थी घाबरलेल्या मनस्थितीत परिक्षा खोली मध्ये प्रवेश करीत होते.

घड्याळाचा काटा पुढे सरकू लागला. परीक्षा निरीक्षक उत्तर पत्रिका घेऊन येवू लागले वर्गात आल्या बरोबर सर्व मुले नीट बसलेली आहेत की नाहीत ते पाहिले. कुणाची कांही अडचण असल्यास दूर केली, आणि मग वह्या पुस्तके दूर ठेवण्याची त्यांना आठवण करून दिली. विद्यार्थी आपले शस्त्र पेन घेवून तयार होते इतक्यात दुसरी घंटा झाली. आता निरीक्षकांची धावपळ सुरु झाली. उत्तर पत्रिकांचे गठ्ठे घेऊन ते वाटू लागले. त्यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्या वरील भाव पाहण्यासारखे होते. "आपण कोणी तरी मोठे ह्या सर्व दिव्यातून बाहेर पडलेले यशस्वी वीर" असे त्याना वाटत होते.

लगेच पेन सरसावून हे वीर लिहावयास लागले. किती लिहू किती नको असे त्याना झाले होते. एवढ्या मोठ्या परीक्षा इमारतींत संपूर्ण शांतता होती. आता आपल्याला उभे राहता येणार नाही असे समजून मी घरी परतलो. वर्गातल्या वर्गात मी नजर फिरवली. कांही विद्यार्थी हताश बसले होते. वर्षभर अभ्यास न केल्याचा पश्चात्ताप त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. निरीक्षक आता फेऱ्या घालीत होते आणि तीन तास केंव्हा संपतील याची वाट पहात होते.

अशा मनः स्थितीत असताना तिसरी घंटा झाली. निरीक्षकानी विद्यार्थ्यांच्या हातात प्रश्नपत्रिका दिल्या. अधाशी नजरेने ते त्या वाचू लागले आणि घडपड जरा कमी झाली. कारण सर्व केलेलाच भाग आलेला होता.



Scanned with CamScanner

# प्रेम पुराण -

कोले एस. एल.
B. A. III

प्रेम ही एक अशी शक्ति आहे की तिला कड्या कुलपे अडवू शकत नाहीत आणि विझवू पाहिल्यास विझत नाही. ते एकदा व्यक्तिच्या मनात निर्माण झाले की ते अहर्निश तडफडत धडपडत असते. आणि त्याची ही धडपड सर्व विश्वाला व्यापून आहे. जिच्या वास्तव्या मुळे सर्व विश्व सुंदर बनले आहे.

तारुण्याचे विचार हे क्षणिक व विशाल असतात. अशक्यप्राय गोष्टीत गुरफटून घेऊन प्रयत्नशील न राहता डोळे झाकून अंतःर्मूख होणे हा त्याचा गुणधर्म आहे. संकटसमयी अपमानाचा वास लागताच त्याचे हृदयाचे पाणी होते. त्या कटुसत्याची साक्ष आपल्याला प्रेमिकाच्यांत मिळेल. आणि तो आपला नित्याचाच अनुभव आहे. प्रेमासाठी वण वण फिरणारे हे प्रेमवीर आपल्यातच दिसतात. मात्र हे अप्रत्यक्ष प्रत्यक्ष प्रयत्न करत असताना त्यांच्यात पहिल्यांदा प्रेम करण्याची आशा निर्माण होते. आणि मग त्यांची मांजराच्या जपून टाकलेल्या पावलासारखी वाटचाल सुरू होते. आणि कुठे सुदैवाने असो वा दुर्दैवाने असो त्याला आशेचा अंकुर दिसू लागताच त्याच्या मनाची तारांबळा विचारूच नका काळाचा विलंब त्याला त्रासदायक वाटत नाही.

आणि आता त्याच्या प्रेमाची खरी सुरवात होते. मात्र ते प्रयत्न अनेक प्रकारचे असतील. एखादा प्रेम करू पाहणारा प्रियकर पहिल्यांदाच एखादी ' प्रेम पत्रिका ' आपण पाहणाऱ्या तरूणीकडे देतो. आणि मग त्या पराक्रमाची प्रतिक्षा करत बेभान होऊन जातो. त्याला स्वतःचा विसर पडतो. अशा या चातकावस्थेत त्याला अपेक्षित साध्य जर मिळाले नाही तर त्याला सारे जग नकोसे वाटते. साऱ्या जीवनाची किमत तो त्या निरपेक्ष भेटीत मोजतो. पण तो खऱ्या प्रेमिकांचा पुरुषार्थ नव्हे त्या निरपेक्षतेच्या भेटीतच ' खऱ्या जिवंत प्रेमाची ' ग्वाही असते, आव्हान असते. अर्थात याला अपवाद असतील. पण जगात अकाली मृत्यू पावणारी ध्येयेच अधिक असतात.

बासरी वाजविल्यास सूर हा निघणारच
दीप लाविल्यास ज्योत ही दिसणारच.

पण त्यांच्या मार्गात एक गोष्ट आवासून उभी राहते. आणि ती म्हणजे धर्म आणि नितीमत्ता, लोकरीती आणि लोकरुढी आणि त्या सर्वांना चिकटून असलेली लाज / शरम होय. समाजातील ही परिस्थिती त्यांच्या आड येते. त्यात धर्मभोळेपणाची कल्पना महत्वाची असते. पण वस्तूस्थितीध्ये तितकेसे सत्य लपलेले नसते. एखादा धर्मप्रसारक असे सांगून जातो की, हे मानवा तू सुदैवाने म्हण किंवा योगायोगाने म्हण तू ' मानव ' म्हणून जन्मला आहेस. तेव्हा तूझ्या जिवन मार्गात धर्माने जा अगर अधर्माने जा पूण्याईने जा अगर अपुण्याईने जा, माणूसकीने जा अगर अमाणूसकीने जा पण जगातील या सर्व सुंदर गोष्टींचा तू अवश्य आस्वाद घे. पण या लंगड्या प्रवचनानुसार माणसाला चालून भागणार नाही. त्याच्या जीवनात कोणत्याही कृतीत धर्म, पुण्याई आणि माणूसकी ही ३ तत्वे जर आली



Scanned with CamScanner

तर त्यात अधिक सुंदरता येईल. त्यातच साऱ्या जीवनाचे रहस्य आहे. केवळ उपभोगितेच्या तत्वाने चालशील तर नक्की तुझ्या भविष्यात केव्हा ना केव्हा तरी आणि कुठे ना कुठे तरी मोठा अ‍ॅक्सिडेंट ठरलेला आहे.

म्हणजेच एखाद्या प्रियकराने प्रेयसीची आणि प्रेयसीने प्रियकराशी एक क्षणैक, आत्मिक आणि शारिरीक सुखाची, चैनीची वस्तू म्हणून चालणार नाही. 'मनुष्य' ही चैनीची वस्तू नसून ती कर्तव्याची भूमिका आहे, हे आणि ह्या कर्तव्याच्या भूमिकेमुळेच त्या सुखात चिरकालीनता सहृदयता आली पाहिजे. मग ही सर्व चर्चा अर्थात 'लव्ह-मॅरेज' या व्याख्येत बसविली पाहिजे. मात्र ही दोन जिवांशी सुरावट जमताना त्यात जात – गोत, धर्म, वंश आणि सांपत्तिक स्थितीचा विचार करून चालणार नाही. आणि हीच जिवंत प्रेमाची पवित्रता होय.

अशा या मंगल कार्यात खुळचट धर्मभोळचा कल्पना, निरुपयोगी नि विनार्थी अशा लोकरूढी रीती आडव्या येऊ शकत नाहीत.

म्हणजे ह्या मातृभूमिवर खऱ्या अर्थाने कुरूपतेला देखील चिरकाल सौंदर्याची, दुःखाला सुखाची, अपुण्याईला पुण्याईची, अधर्माला धर्माची आणि बेसुराला सुराची देणगी देऊन प्रेमाच्या राज्यातील अंतिम स्थानाची ( Love Marriage ) स्थापना करणारा तो एक कलाकार 'खरा प्रियकर' ठरेल.

गुणदोषाचा पुर्ण परिचय हीच खाइवन प्रेमाची 'रिटन टेस्ट' होय, पण या गुणदोषामध्ये केवळ किरकोळ दोषाकडे पाहून प्रेयसीने प्रियकराकडे आणि प्रियकराने प्रेयसीकडे पाठ फिरवावी हा शहाणपणा नव्हे. त्यात तडजोड फार महत्वाची असते. त्या तडजोडीमध्ये अहंमपणाला मुरड घालावी लागते. पण ती किरकोळ आहे. यात स्वतः थोडे मुर्ख बनल्यासारखे वाटेल. स्वतःला मुर्ख समजण्यातही शहाणपणाची सुंदरता आहे.

पण सर्वसाधारण आजच्या तरूण – तरूणींची प्रेमाविषयीची कल्पना अशी झाली आहे की, आपण सुंदर सुंदर कपडे वापरावे, लांब लांब केस वाढवावे, फेसिंग मेक-अप् करावे म्हणजेच एकंदरीने सर्व फॅशन्सचा स्विकार करून या प्रेमाच्या बाजारपेठेत फिरावे म्हणजे आपल्याला प्रेम मिळेल. पण त्या प्रेमपिस्या तरूणांनी–तरूणींनी हें लक्षात ठेवले पाहिजे की, प्रेम हे बाजारात विकत मिळत नाही. ते नटव्या थाटाला भुलत नाही.

तेव्हा तुझ्या ऐकण्यात लयबद्धता, पाहण्यात मोहकता आणि चालण्यात गती असू दे. आणि हे सारे तुला प्रेमिकाच्या राज्यात मिळेल. मात्र तूला त्यासाठी त्याग करावा लागेल. त्यांगाच्या वेलीला माणूसकीचे संरक्षण द्यावे लागेल आणि अश्रूंचे शिंचणही करावे लागेल. मग तेव्हा कुठे त्या वेलीला प्रेमाची फुले येतील.

**समाजवादः**

माणसाजवळ किती आहे यावरुन त्याची किंमत ठरु नये. तो माणूसच कितीचा आहे यावरुन त्याची किंमत ठरविली जावी. ही किंमत वाढविण्याचा विचार म्हणजे समाजवाद !



Scanned with CamScanner

# प्रीती –

आर. एन. देवाडे
द्वितीय वर्ष साहित्य

" जे पाडते ते प्रेम नसते. प्रेम तर त्यालाच म्हणतात की, ज्याने माणसाचा उत्कर्ष होतो. आणि त्यांची दृष्टी व्यापक बनते.

प्रेम हे शारीरिक आकर्षणापेक्षा फार उच्च आहे. पुष्कळ तरूण तरूणींना जो एकटेपणा वाटतो त्यापासून सुटका मिळवण्याचा प्रेम हा एक उत्कृष्ट मार्ग आहे. " प्रेम करणारी व्यक्ति त्या धुंदीत जगाची उपेक्षा करू लागली तर ते खर प्रेम नव्हे. प्रेम ही एक विलक्षण आग आहे. जी लावल्याने लागत नाही की विझवल्याने विझत नाही. " प्रेम म्हणजे हृदयाचा विकास "

प्रेमाच्या अशा अनेक व्याख्या अनेक साहित्यिकांनी केल्या असल्यातरी संपूर्ण आणि खऱ्या प्रेमाची सार्थ व्याख्या अजून पर्यंत कोणालाही करता आलेली नाही. कारण प्रेम ही भावनाच अशी आहे की, तिचा उगम, केंव्हा, कसा आणि कोठे होईल हे देखील सांगता येत नाही. काही वेळा बालपणातील भातुकलीच्या खेळातून प्रेमांकुर उगवतो. काहीवेळा एकमेकांची नजर भेट होताच त्या ठिकाणी प्रीतिवेल रुप धरते तर काही वेळा सहल, पिकनिक यातून तरूण तरूणी आपल्या प्रेमाचे धागे गुंफतात. त्याचप्रमाणे तारूण्यालाही लाजवील असे वृद्ध व्यक्तिचे प्रेमी जीवन जगणाऱ्या व्यक्तिही थोड्या नाहीत.

प्रेम कस होत, कुठून येतं, केव्हा येतं सांगता येत नाही. वसंत बापट म्हणतात,

" शैशव आपुले सरले होते, सरले नव्हते "
" सारे काही कळले होते, कळले नव्हते ",

जरा पुढचं पाऊल पडल्यावर काय होतं ?

" गाल द्यायचा कुस्करण्या कधी तुझ्या करात
उगीच लाजून लपायचा मी माजघरात !
समजत होते जरी तुला हे सारे काही
" वेडा कुठला ! " म्हणायचीस तू, दुरून ते ही ॥

एक दिवस भितीही वाटू लागते.

" कसे सांगू तुला . . . . वाटे
मला भय अनामिक
आहे इतुका निष्पाप
तुझा खळाळता हर्ष
माझ्या किल्मिषाचा त्याला
नको गडे व्हाया स्पर्श !

अशी जपणूकही यात आहे.

" तुझ्या स्वप्नानी रंगते,
माझी अर्धी–मुर्धी नीज
तुझ्या भेटीमध्ये त्याचे
कधी करशील चीज ?

असा मनाचा अधीरपणा वाढतो.

असा प्रियकर जरा धीर बनून काय मागेल ?



Scanned with CamScanner

“एक खट्टी मिट्ठी गोळी घेऊ वाटून दोघात.
अर्धी तुला अर्धी मला वर चिमणीचे दात।
हवेत कोणा दोन्ही गाल बरा(एका वेळी)एक
दोन ओठापैकी देई फक्त अधर अर्धुक ! ”

सगळे दिवस कांही सारखेच नसतात. काही वेळा आठ आठ दिवस दोघांची गाठभेट होत नाही. दोघानाही भेटीची ओढ लागलेली असते आणि अचानक एक दिवस गाठ पडते. तो तिला इतके दिवस न भेटण्याचे कारण विचारतो. तेंव्हा ती आपली अडचण आणि भेटीतील अडथळे न सांगता अत्यंत रसमधुर भाषेत आपल्या प्रियकराची समजूत घालते. प्रिया समजूत घालताना म्हणते

“ जेंव्हा तुझ्या भाळावर एक उभी शीर फुगते
मीच तर गार झुळुक होऊन, हात लावून बघते
दिवसा चुकामुक झाली की, स्वप्नात भेट होतेच,
( जसे कांही कळते आहे, हे तुला नव्यानेच ! )

पण हे फार दिवस चालत नाही. नियतीला हे बघवत नाही. दोघांच्या वाटा विरूद्ध दिशेने कुठेतरी पोहचतात. आता सारे संपले असताना एक दिवस अचानक गाठ पडते. सयत्या निघतात.

“ भरल्या का जखमा त्या ?
बुजले का ओरखडे ?
मंगळसूत्रात तुझ्या
सर्व खुणा लपव गडे . . . नाव उगा . . .
आज जरा . . .
ये क्षणभर या सौधावर
तोच ऐट निरपराध
तेच सोंग साजेसे
आण जरा . . . „ . . . . ”

प्रितीची वाट सरळ, निष्कंटक कधी नसते. सफलतेपेक्षा विफलताच अधिक. हे विफलतेचे सौभाग्यही सर्वानाच लाभते असे नाही. विफलतेतही सफलता मानणाऱ्या दुर्बम्य अशा नितांत सुंदर नविन निळेचे महात्म्य सगळ्यानाच समजेल असे नाही.

“ It is better to have loved and lost than never to have loved ”

**वेदना . . विचार . . संदेश :**

मी मनाने व शरीराने अस्वस्थ आहे. डोक्यात असह्य वेदना ! काय करु ?

माझा शेवटचा निरोप: लोकशाही, सत्याग्रही समाजवाद हे ध्येय धरा. ते तारील . . . अजातीय व अहिंसक, लोकशाही व सत्याग्रही दृष्टी घ्या. भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो. व्यक्ति स्वातंत्र्यासह समाजवाद फुलो.

— साने गुरुजी



Scanned with CamScanner

# अश्रू !

सुभाष संकेश्वरी
B. (Com.) I

'अश्रू'! केवळ या शब्दाचा उच्चार जरी केला तरी माझे डोळे कसे अश्रूंनी भरून येतात! अश्रू म्हणजे मानवाला परमेश्वरानं दिलेली एक अमोल देणगीच होय, खरंच 'अश्रू' म्हणजे मानवी जीवनाला लाभलेलं एक वरदान! कुणी म्हणेल, अश्रूना देणगी म्हणणारा माणूस मूर्खच असला पाहिजे. थोडयाशा दुःखानं डोळयातून ओघळणाऱ्या नि दुबळं बनणाऱ्या त्या खाऱ्या पाण्याला वरदान म्हणावं? आश्रु हे दुबळयाचं लक्षण आहे. होय! खरं आहे त्यांच म्हणणं कारण त्या बिचाऱ्यांचा काय दोष? ज्यांनी आजवर कुणासाठी खऱ्या अर्थानं अश्रू ढाळले नसतील त्यांना त्या 'अश्रूची' किंमत कशी कळणार ? या अश्रुंचं मोल त्यांना तेंव्हाच, समजेल, जेंव्हा, त्यांचे नेत्र एखादयासाठी खऱ्या अर्थानं अश्रू ढाळतील.

तुम्ही म्हणाल, हे अश्रू मानवाला असं कोणतं सुख देतात, म्हणून त्यांना वरदान म्हणावं? हे ही कबूल करावं लागेल की, या अश्रूंपासून प्रत्यक्ष मुर्त सुख असं लाभत नाही. पण त्याच बरोबर या ही गोष्टीचा विचार करायला हवा कि माणूस केवळ प्रत्यक्ष लाभणाऱ्या शारीरिक सुखासाठीच धडपडत नसतो, तर त्याला मानसिक सुखाची, की जे अमृत असतं, त्याचीही आत्यंतिक जरुरी असते. पण यांचा अर्थ असा नव्हे की केवळ अश्रूमुळेच मानसिक सुख लाभतं. खरोखरच जे सुखी आहेत त्यांना अश्रू ढाळण्याचं कारणच काय? पण मला वाटतं त्यांनीही केंव्हा ना केंव्हा अश्रू ढाळले असतील आणि ढाळतील ही· म ते आनंदाश्रू असतील. कदाचित! काहीही असो मनुष्य सुखी असो अथवा दुःखी या सर्वांनाच अश्रूंची साथ असते. विशेषतः दुःखिताना तर जन्मभर साथ देणारे जर कोणी असतील तर ते अश्रूच!

या जगात अनेक माणसं अनेक कारणांनी जीवनात दुःखी झालेली असतात. प्रत्येकाचं दुःखाचं कारण वेगवेगळे असते. आणि मग अशा दुःखितांना हे स्वार्थी जग जवळ करीत नाही. ज्या माणसाला स्वःतला दुःख झालेलं असतं त्यालाच दुसऱ्याचं दुःखं कळतं स्वतःच्या दुःखानं अंतःकरण मृदु झालेलं असल्याखेरीज दुसऱ्याच्या दुःखाची खरी जाणीव होत नाही माणसाला " त्यांना चार धीराच्या गोष्टी सांगून त्यांच्या दुःखात सहभागी होण्याचा कोणी प्रयत्न करीत नाही. उलट त्यांना दुःखाच्या खोल गर्तेत कसं ढकलता येईल याचा सर्वजण विचार करीत असतात. कारण या जगात सारे सुखाचेच भागीदार असतात आणि मग अशा प्रसंगी ती दुःखी व्यक्ती अधिकच दुःखी, अधिकच निराशाग्रस्त बनते. त्यांना जीवन अगदीच असह्य वाटू लागतं म्हणून,

जिंदगीमें आना है, तो जीना ही पडेगा,
जीवन ही जहर है, तो पिना ही पडेगा।

अशावेळी मग तो अश्रूंना जवळ करतो. अश्रू म्हणजे दुःखीतांचे जीवन साथीच



Scanned with CamScanner

दुःख को चिंता क्यों सताती है
दुःख तो अपना साथी है
दुःख एक छाँव है ढलती
सुख है एक छाँव ढलती

मानवी जीवन सुखदुःखांनी भरलेलं आहे. माणसाला जेव्हा जेव्हा दुःख होतं, तेव्हा तो अश्रू ढाळत असतो. अश्रू ढाळण्याने दुःखे कांही कमी होतात अशातला प्रकार नाही, पण डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहिले म्हणजे दुःखाचा भार थोडा हलका झाल्यासारखा वाटतो. एकप्रकारचं आंतरीक समाधान लाभतं. मनुष्य जेव्हा अश्रू ढाळत असतो तेव्हा त्याला जे सुख लाभतं ते केवळ अवर्णनीयच!

मानवी जीवनात अनेकांना अनेक दुःखं असतात. कुणाला मातृवियोगाचं दुःख, कुणाला पुत्रवियोगाचं दुःख, कुणाला पतिवियोगाचं दुःख तर कुणा प्रेयसीला आपल्या लाडक्या प्रियकराच्या विरहाचं दुःख याशिवाय आणखी बरीचशी दुःखं असतात. या सर्वांच्या जीवनात वियोगामुळे, विरहामुळे वैफल्य निर्माण झालेलं असतं. आणि अशा तऱ्हेनें वैफल्याने भरलेलं जीवन जगत असताना त्याला सतत साथ देणारे जर कोणी असतील तर ते अश्रूच! अशावेळी हे अश्रूही नसते तर! जगणं मुष्कील झाले असतं. जीवन विषमय झालं असतं.

※※

२)

प्रत्येक जण अश्रूंचा भुकेलेला आहे. हसण्या-खेळण्यास, मौजमजा करण्यास हवे तितके मित्र मिळतात, पण आपल्यासाठी रडणारी एक तरी व्यक्ति मिळेल का? म्हणून प्रत्येक मनुष्य तशी व्यक्ति शोधीत असतो. त्याला आपल्या दुःखाला भागीदार हवा असतो. आपल्यासाठी कुणी तरी दोन अश्रू गाळावेत, असे त्याला वाटते! मला तरी असे वाटते की दुसऱ्या करिता दुःखी होण्यात याच मुळे पावित्र्य आले असावे दुसऱ्याला थोडे लागले तरी लहान मुलांच्या डोळ्यात लागलीच पाणी येते. दुसऱ्याला मार बसला तरी काही लहान मुले सहवेदनेने रडतात, असे माझे मन असावे, असे मला वाटते. मला अश्रू लपवायचे नाहीत. बुध्द, महात्मा गांधी यांच्या अश्रूतले सामर्थ्य मिळाले तर हवे आहे. ज्यानी आजन्मात दुसऱ्याकरिता अश्रू ढाळले नाहीत, त्यांच्या सारखे दुर्भागी तेच! ते कधीही रडत नाहीत, म्हणून मी त्यांना शुर, भाग्यवान म्हणू काय?

"खरे अश्रू हे निरपेक्ष व व्यापक प्रेमाचे पाझर आहेत". सुखाचे सासर असतानाहि माहेर सोडून जाताना कन्या रडते त्यात जिव्हाळा व काव्य आहे. "निराशमय कालातील अश्रूत आशा आहे" तपा-नंतर होणाऱ्या पुनर्मिलनाच्या वेळी अकस्मात येणाऱ्या अश्रूत उत्कट प्रेमाची विशुध्दता आहे. अश्रू! सारे भावनाविश्व या लहानशा अश्रूबिंदूत सामावले आहे!

**एम. आय. पेडणेकर**
१२ वी आर्ट.

※※

३)

अश्रूंच माहात्म्य पूर्णत्वानें साने गुरूजीनाच कळलं होतं. एका अश्रू बिंदूत सारा हिमालय विरघळ वण्याचे सामर्थ्य आहे अश्रूच्या एका थेंबात आदी – अनादी – अनंत ब्रम्हांड बुडवता येण्याची शक्ती आहे. प्रेम कारूण्याचा अर्थ म्हणजे अश्रू.
हसू आणि आसू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक वरचं आहे, दुसरं आतलं आहे. वरचा सुखद भाव–तरंग म्हणजे हसू. अंतरातील खोल कळ म्हणजे आसू.

सर्व विश्वात कोणालाच नाही, असं एक अलौकीक सामर्थ्य परमेश्वरानं साने गुरूजींना बहाल केलं होतं. असं ग. दि. माडगूळकर सांगतात. कोणतं हे सामर्थ्य? – – चिंता

साऱ्या जगाची चिंता वाहायची, कल्पनेच्या दुःखाचीहि काळजी करायची आणि हळूहळवं बनून 'सर्वे ऽपि सुखिनः संतु' अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करायची अशी शांत करुणामय तेजस्वी मूर्ती म्हणजे सानेगुरुजी.

**कु. यमाटे**
१२ वी



Scanned with CamScanner

# माझं मनोगत :

रामगोंडा सिदगोंडा पाटील
B. Com. III

माला तो कॉलेजमधील पहिला दिवस अगदी स्पष्टपणे माझ्या नजरेसमोर भरून राहीला आहे. हायस्कूलमध्ये असतानाच आम्ही काही सवगंडी कॉलेजविषयक कल्पना रंगवित असु त्यातील अगदी महत्वाची म्हणजे कॉलेजला जायचं, ते अगदी पॉश मध्ये जायचं हातात अेकादच पुस्तक धरायचं. फार तर अेकादोच वही आमच्या पूर्वीच्या कल्पनेप्रमाणे पहिल्या दिवशी अगदी पॉश मध्ये जायचं ठरविलं व त्याप्रमाने अेक लेंडकी विजार व त्या विजारीला शोभून दिसेल असीच परंतु शरीराला अपुराच पडणारा अेक मॅनिला चढवून कॉलेजवर आला. कारण हा माझा ड्रेस (कॉलेजमधील) हायस्कूल मधील ड्रेस पेक्षा फारच पॉश होता. माझ्या पूर्वीचे २–३ वर्ष कॉलेजमध्ये आलेले विद्यार्थी माझ्याकडे आश्चर्याने पहावयाचे मला अेक प्रकारचं समाधान वाटत होते. कारण माझ्यादृष्टीने त्या दिवशी फारच पॉश मध्ये होतो परंतु वर्गातून बाहेर पडताना माझ्याकडे डोळे वळवित कांही .मुलीही कुजबूज लागल्या त्यांच हास्य मात्र कांहीशा कुचेष्टेचं होतं मन मात्र त्या पावसाळयाच्या दिवसात सुध्दा अगदी दरदरुन घाम सुटला. जवळ जवळ रूमाल बाळगण्याची सवय नसल्यामुळे व पूर्वीच्या माझ्या सवयीप्रमाणे घामावलेल्या चेहऱ्यावरून नेहमीप्रमाणे हातोप्याचा वापर करावा लागला तसाच. गोंधळलेल्या मनस्थितींत कॉलेजवर कधीही न येण्याचा बाणा केला. व शक्य तितक लपून छपून अनेकांच्या नजरा चुकवून त्या गर्दीमधून रस्ता धरला. माझ्यां कॉलेजमधील? हा पहिला दिवस . . .त्यानंर काही दिवसानी मात्र सर्वांमध्ये मिळून मिसळून वागणारा व अगदी साधाबाधाच ड्रेस घालणारा म्हणून कॉलेजचा श्रीगणेशा केला.

कॉलेजची मुलं म्हणजे महाबिलंदर, ह्या दूषित-गृहामुळे कॉलेज मधील पहिली २ वर्षं कोणामध्ये न मिसळता साध्या आणि सरळमार्गांनी कशीतरी ओलांडली. हळूहळू अेकमेकात मिसळण्याची नवनवीन विषयावर चर्चा करण्याची सवय लागली. ह्याचमुळे आम्ही काही समतत्वाची मुले एकत्रयेऊ लागलो त्याचप्रमाणे आम्ही प्राध्यापकवर्गाला देखील अत्यंत जवळ आली. त्यानीही हसत खेळत, मित्राप्रमाणे, प्रसंगी आईवडिलाप्रमाणे अचूक व योग्य मार्गदर्शन केले. त्यच्या तळमळीनं व प्रामाणिक पणानी वजावलेल्या कर्तव्याच्या भावनेबद्दल पुष्कळ लिहावंस वाटतं पण अपुऱ्या ज्ञानामुळे शब्दातून खऱ्या खुऱ्या भावना व्यक्त करणं अधिक कठीण वाटतं, प्रथपासून अेक सर्व सामान्य विद्यार्थी असल्यांमुळें प्रत्येक सामान्यविद्यार्थांची अडचण काय असते किंवा त्यामुळे त्यांचां कोंडमारा कसा होत असतो त्याची पूर्व जाणीव होती. त्यासाठीं माझ्या विद्यार्थी मित्रासाठी त्यांच्या कॉलेजमधील अडीअडचणी साठी काहीतरी कराव असमला फार दिवसापासून वाटत असे. परंतू निवडणूकीच्या संदर्भात आश्चर्य असे की त्या संदर्भात अनुभवी असलेला मी व माझ्याबद्दल असलेल्या मित्रांच्या कल्पना या सर्व माझ्या दृष्टीने कवीकल्पनाच होत्या. पण योगायोग असा की माझचं अंग बणून राहिलेले माझे अेक निकटचे सामान्य मित्र श्री. के. आर. चव्हाण (कस्तुरबा वालचंद महाविद्यालय सांगली जी. अेस १९७४-७५ हे कॉलेज निवडणूकीत चांगलेच अनुभवी होते.) त्यांच्या अनुभवाचा



Scanned with CamScanner

आधार, मार्गदर्शन शिवाय मित्राचं पाठबळ यांनी मला खंबीर बनवलं. तरी माझी सामान्य विद्यार्थ्यांत नेहमीच राहणी असल्यामुळे सामान्य विद्यार्थ्यांना आत्मसात करण्याची वृत्ती अंगवळणीच पडली होती.

कॉलेजमधील पूर्वीच्या आठवणीचे ते दिवस डोळ्यासमोर दिसावयाचे. मुलांनी भरपूर चहापान घ्यावयाचं शेवटी दानशूरपणे पैसेही घ्यावयाचे आणि या सर्व खटाटोपातून आपला स्वार्थ साध्य झाला नाही तर जबरदस्तीने मतदारांना पळवून न्यावयाचे. दुसरी गोष्ट अशी की उल्लेख करण्यासाठी थोडं वाइट वाटतं तरी वस्तुस्थितीला धरुन मी माझें मनोगत लिहणार असल्यामुळे सांगावसं वाटत की निवडणूकीच्या संदर्भात देखील कांही प्राध्यापक मंडळीसुध्दा स्वतःचा किंवा स्वतःच्या जातीधर्माचा निवडून यावा म्हणून खटाटोप करीत असतात. खरोखरच जातीभेद न मानणारे, यांची शिकवण देणारे, तरूण पिढ्याचा आदर्श ठरणारी ही मंडळीसुध्दा आतून अशी भावना व्यक्त करण री असतात. असे हे सर्व पूर्वीचे दिवस आठवले की कॉलेजमधील निवडणूकीस राम राम ठोकून या निवडणुकीपासुन दूर शांत रहावं हेच बरं वाटत, कारण एक वर्षभर निवडून येऊन विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी म्हणून मिरवून घेण्यासाठी जातीभेद या तत्वाला मुठमाती द्यावयाची आणि मी तुझ्याच जातीचा आहे असे सांगून थापा मारण्याची सवय लावून घ्यावयाची. प्रसंगी कांही नीच व हलकट विद्यार्थ्यांच्या मनधरणींसाठी हजार पंधराशेहे रूपये खर्च करावयाचे व अत्यंत महत्वाचं म्हणजे या सर्व घाणेरड्या गोष्टीचा अवलंब करताना स्वाभिमानी व व सरळ मार्गांनी जाणाऱ्या मित्राना कायमचं परकं व्हावयाच ह्या गोष्टी स्वाभिमानी प्रामाणिक व सचोटीच्या विद्यार्थ्याला अशक्य व असह्य होत्या. तरी माझ्या सर्व मित्रमंडळीनो अशा हलकट गोष्टीना मूठमाती देवून प्रामाणिकपणे निवडणूक लढविण्याचे आजपर्यंतच्या निवडणूकीस अपवाद ठरेल असं ठरविलं ती मित्रांची जिद्द आणि तळमळ अवर्णनीय आहे. त्यांनी निवडणूकीच्या शेवटच्या क्षणापर्यंत कॉलेजला कलंकास्पद अगर कोणालाही अपमानास्पद असं कांही केल नाही. अशारितीने वैशिष्टपूर्णरीतीने निवडणूक पार पाडून विद्यार्थीमित्रानी मला शिवाजी युनिव्हर्सिटीवर आपला विद्यार्थी प्रतिनीधी म्हणून निवड केली. आमच्या या कॉलेजची निवडणूक ही येत्या लोकशाहीच्या आगामी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराना सुध्दा अेक आदर्श ठरेल. अेकंदरीत माझ्या कॉलेजची निवडणूकीत माझी निवड ही प्राचार्य बलवंत देशमुख व बहूसंख्य प्राध्यापक वर्गाला आवडली. त्यांनी माझं अंतःकरणा पासुन अभिनंदन केले. व सबंध वर्षात मला कसलीच उणीव भासू दिली नाही. विद्यार्थी मित्रांच्या अडचणी मी त्यांच्याजवळ वारंवार मांडल्या. त्या त्यांनी अगदी हसत मुखानी सोडवल्या व आम्हास उ पकृत केला व्यक्तिशः प्राचार्यांचे व प्राध्यापकांचे गरीब विद्यार्थावरील हे ऋण कधीही विसरण्यासारखे नाहीत.

गॅदरींगच्या वेळी स्पोर्टस् बंद करण्याचा निर्णय घेतला होता. परंतू स्पोर्टस् विभाग हे गॅदरिंगचे प्रमुख अंग असल्याकारणाने स्पोर्टस् झाल्याखेरीज खऱ्या अर्थानी गॅदरिंगचा आनंद घेता येत नाही. शिवाय कांही बोटावर मोजता येण्यासारख्या दुष्ट मुलांची समजूत घालून खेळामधुन निर्माण होणारी निष्फळ भांडणे टाळता येतील व २–३ दिवस सर्वांचीच करमणूक होईल. या उद्देशाने आम्ही मिटिंगमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी हट्ट धरला. प्राचार्य व प्राध्यापक कधीही मुलांच्या विरुध्द जाऊन त्यांची मने दुखावण्याची भूमिका घेत नव्हते. त्यांनी मंजुरी देवून आमचे लाड पूरवले. कोणत्याही प्रकारचा दंगा होणार नाही या वचनानी आम्ही बांधले गेलो. व आश्चर्य असे की, अेखादाही विद्यार्थी तक्रार न करता व उत्साहपूर्ण वातावरणात आमचे स्पोर्टस् पार पडले. प्राचार्यांनी आमच्या व्यवस्थेबद्दल व वैशिष्टपूर्ण कार्य केल्याबद्दल व शिवराज महाविद्यालयात नविन परंपरा निर्माण केल्याबद्दल आमचे कौतूक केले. खरोखरच त्यांचा विद्यार्थ्याबद्दलचा जिव्हाळा हा कांहीसा वेगळाच आहे.

या वर्षी झालेलं गॅदरिंग म्हणजे दिपावली म्हंटल तरी अतिशयोक्ति होणार नाही. अेकंदरीत त्या मुलामुलींचा उत्साह प्रत्येक प्राध्यापकवर्गाला झालेल



Scanned with CamScanner

वेगळाच आनंद आणि त्या आनंदात भर घालण्यासाठी नव्यानेच निर्माण केलेली ती दिव्य आणि भव्य कॉलेजची नवी वास्तू इतर कॉलेजच्या मानाने जरी लहान असली तरी आल्हादायक स्वच्छ वातावरणात असलेली विद्यार्थी विद्यार्थीनींना आकर्षूण घेणारी ती अशी वास्तू. अशा सर्व गोष्टीमुळे विद्यार्थी विद्यार्थीनी, प्राध्यापकापासून प्राचार्यापर्यंत गॅदरिंगचा आनंद लुटण्यात मग्न दिसत होते. खरोखरच अगदी अल्लड व लहान मुलाप्रमाणे अत्यानंदाच्या आवेशाने सगळी हुरळून गेली होती. प्रत्येक मुलामुलीना असं वाटत होतं की या गॅदरींगमध्ये सर्वांत मोठा वाटा आपलाच आहे. मीही अपवाद नव्हतो. मला झालेल्या आनंदाचे वर्णन मी करु शकत नाही. कारण इतर, पेक्षा माझी भूमिका वेगळीच होती. माझ्यावर फार मोठी जबाबदारी होती. मी माझ्या जबाबदारीपोटी कर्तव्ये पार पाडीत होतो. अशा रितीने शिवराज महाविद्यालया चे गॅदरिंग शिवराज या नावाला शोभेल असं अगदी शिवरायाच्या राज्याभिषेकासारखं पार पडलं आणि दुसऱ्याच दिवशी कॉलेज जीवन एकदाचं संपवलं. या निराशेच्या विचारात गढून गेलो' व मला माझ्या चार वर्षातील सर्व बरे वाईट प्रसंग माझ्या डोळ्यासमोर दिसू लागले. तो कॉलेजचा माझा पहिला दिवस-खरोखरच किती तफावत दिसून येते?

इंपॉर्टंट:

शैक्षणिक प्रक्रियेस अवघा समाजच सहभागी व्हावा लागतो. शिक्षण म्हणजे विद्यार्थी – सरकार – अध्यापक यांच्यापुरता आपापसातला मामला नव्हे. अवघ्या समाजाच्या चिंतेचा तो विषय बनावा लागतो. आजच्या शिक्षणात काय दिसते? सरकार आपल्या जवळच्या थैलीचा आवाका बघून विचार करते.अध्यापक रजा – बदल्या – नेमणूका – वेतनमान याचा विचार करतो. विद्यार्थी इंपॉर्टंट, व्हेरी इंपॉर्टंट, मोस्ट इंपॉर्टंट याचाच विचार करतो.



Scanned with CamScanner

# 'उमेद' 'झुंजार' अंतरंग !

आण्णासाहेब शिवाप्पा शेट्टी
B. A. III Mar. (कडगांव)

नव्या दमाचे निरनिराळ्या भावभावनांचे, विचारकल्पनांचे आणि वास्तवतेचे तसेच सुप्तासुप्त गुढाविषयीचे चातुर्याने शब्दांकन करण्याचे कार्य शिवराज महाविद्यालयातील दोन भितीपत्रके करीत आहेत.

तरुणपण हे आगळं वेगळं असतं- एकप्रकारचा जोम असतो. त्यात कॉलेज लाईफ हे युवकयुवतींचे मुक्त जीवन म्हणून सामान्यतः गणले जाते. पण ते ग्रामीण जीवनात कितपत मुक्त असते हा प्रश्न वेगळा आहे.

या तरुण मनात नव्या ऊर्मी आणि आवड नर्माण करण्यासाठी प्राचार्य बलवंत देशमुख यांच्या प्रेरणेने 'उमेद' हे जेष्ठ कॉलेजीयनांच्यासाठी तर 'झुंजार' कनिष्ठ कॉलेजीयनांच्यासाठी विद्यार्थ्यांच्या संपादनाखाली काढण्यात आले आहे. यामागे खरा आधार आणि उत्तेजन आहे प्रा. विठ्ठल बन्ने यांचे भितीपत्रकामधील लिखाणाचा आढावा घेताना काही महत्वपूर्ण कवी – लेखकांचा विचार क्रमप्राप्त आहे.

'मदनाच्या स्पर्शानं तारुण्य संचारत की तारुण्याच्या काळात मदन संचारतो असा घुटमळविणारा संभ्रम निर्माण करुन 'तारुण्य लाभले मला' या लेखाची सुरुवात 'शामलकांत गवस' यांनी केली आहे. आणि बेकारीची वाढती समस्या, त्यातून येणारी उदासीनता आणि हतबल होणारा तरूण याने अवसान गळून न बसता उमेदीने, जिद्दीनें पेटून उठले पाहिजे आणि स्वतः बरोबर देशसमर्थ करण्याचं आव्हान स्वीकारले पाहिजे ही विचारपूर्ण मांडणी लेखाला उजाळा आणते त्यामुळेच हा लेख वाचनीय व स्फूर्तीप्रद ठरला आहे.

दुसरा उल्लेखनीय लेख 'शैलज पाटील' यांचा स्वातंत्र्य कोणाचे ? हा होय. ज्या देशामध्ये सुवर्णाचा धूर निघत असे त्याच देशात सोन्यासारखी आबालवृध्द माणसे अन्नान्न म्हणून मरत आहेत, गरिबीत खितपत आहेत आणि यांचा पुरेपूर उपयोग भांडवलदार आणि राजकीय भ्रष्ट व्यक्ति तसेच देशद्रोही स्मगलर्स कसा उठवतात त्यामुळेच हे दैन्य आले आणि राष्ट्र अधोगतीस जात आहे. त्रोटक असावत आढावा १८५७ पासुन घेतला आहे. तसेच ८ ऑगष्ट या दिवशी हा क्रांतीपर, लेख लिहून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी विकासासाठी ज्यांनी प्राणाहुती दिली त्यांचे पुण्यस्मरण करुन आज 'त्यांच्या' ध्येयानुरुप आम्हीही स्वतंत्र आहोत का? नसेल तर कुठवर सोसणार ? अन् कुठवर मरणार ? अशा प्रकारे क्रांतीची भाषा बोलण्याचे धाडस शैलज पाटील यांनी याच क्रांती विशेषांकात, शामलकांत गवस 'यांनी क्रांती कवितेतून या ज्वलंत प्रश्नास दुजोरा दिला आहे.

अज्ञाने का देव पावतो ? अंधश्रध्देत गुरफटलेला आपला समाज अद्याप देवधर्म पुण्यकर्म यात कसा नाशाप्रत पोहचत आहे याचे चित्रण 'जय संतोषी माँ' या आलेल्या धमकीवजा पत्रावरुन कडाडून हल्ला 'विजयकुमार शिरले तृतीय वर्ष' यांनी चढविला आहे. रिण काढून सण करणाऱ्या अनाडी लोकांना



Scanned with CamScanner

व विचारहिन सुशिक्षितांना हे आपण काय करतो अन् सावधानतेचा इशारा या लेखातून वास्तवतेचे स्वरुप आकर्षक मांडणीकौशल्य यातून दिसून येते.

'शैलज पाटील' यांनी अगदी निम्नस्थरातील कॉलेज मधील निवडणूक अन्य अगर निवडणूक यातील भ्रष्टाचार कसे घडतात हे 'निवडणूकीच्या बाजारात' ह्या लेखातून निषेध व्यक्त केला आहे. तसेच अन्यायाविरूध्द चीड उसळते आहे व पुढे काय? याचा इशारा व्यक्त केला आहे. राजकीय, सामाजिक व क्रांतीपर लेखांच्या समवेत प्रेमीयुगुल आणि वाङ्मयीन जगाचा विसर 'उमेद'ला पडलेला नाही. कारण प्रेम प्रकरणाचा विषय 'श्री शामलकांत गवस' यांचा 'कुजबुज' हा ललित लेख आहे. प्रियकराचे प्रेयसीस उद्देशून लिहलेले पत्र म्हणा किंवा कांही म्हणा 'प्रेम प्रकरण' आहे बुवा! संपूर्ण जगाला विसरून गळयात गळा घालून प्रेम करणाऱ्या प्रेमीकाने प्रिय अशा प्रेयसीच्या विरहाने भावनावश न होता वैचारीक बैठक सोडलेली नाही. विरहावस्था–उदात्तभावनाशी संबंधीत आहे. नीरस जीवनात सरसवर्णन पडताळून पहाणारा हा प्रियकर! काल्पनीक विश्वाची जपणूक करण्याची वेळ प्रेयसीने आणली आहे. तरीही प्रेयसीची पूर्वप्रतिमा जवळ बाळगणारा प्रियकर आहे. 'शैलज पाटील' यांचा 'हुंकार' प्रियकराच्या अंर्तमनात दाटून आला आहे असे भासते. या लेखातून जीवनपूर्तते ची ओढ वैचारीकतेबरोबर भावनांचा उद्रेक दिसून येतो. अनुभवाशिवाय खरोखरचे दु:ख समजत नाही.

वाङ्मयीन घडामोडीत सरस्वत कंठमणी, विख्यात साहित्यकार भाऊसाो खांडेकर आम्हा सोडून गेलात आणि मराठी साहित्याची प्रचंड हानी झाली या घटनेवर खांडेकर विशेषांकात 'साहित्य हेच जीवन' हा 'कु. रंजना बेकनाळकर' यांचा लेख आहे. यात विविध ठीकाणी भाषणातून, लिखानातून जीवनाविषयी व साहित्याविषयी 'भाऊं' चा दृष्टीकोन संग्रहीतामधू–न स्पष्ट केला आहे. बी. आर. लांडे यानी 'तारा मावळला साहित्याचा' हा लेख परिणामकारक लिहिला आहे. त्या मध्ये कथारुप वातावरण निर्मिती हे वाचत असता, जणू काय हा प्रकार वालनेस हॉस्पीटल- च्या अवतीभवती घडलाच आहे – भुताटकीची रात्र .... चेटकीनीचा धुमाकूळ, घुबडाचा चित्कार डॉक्टरांची अर्धवट बोलणी इ. व शेवटी

तुरा साहित्याचा । हिरावलाचे आज आम्ही ।
अंधार भासे सारा । आज अबोल आमची वाणी॥

अशा शब्दातून श्रध्दांजलीं वाहिली आहे. याच बरोबर माधवराव गोरुले' यानी 'जीवनासाठी कला' हा, लेख भाऊसोच्या तत्वाच्या शीर्षकाधारे प्रकट केला. तसेच 'सयाजीराव खोत' यानी भाऊसोच्यां साहित्य ग्रथांची नामावली स्मृतीरूपानें 'अमृतवेल' या कवितेतून व्यक्त केली आहे. कु. उल्का भुतकर या संग्राहिकेने भाऊसोच्यां वाङ्मयातील सुवर्णकण वेचले आहेत. अशा प्रकारे भाऊसाो खांडेकरांच्या निधनाचा दु:खवटा हा विशेषांकाने विविध स्वरूपात व्यक्त केला आहें.

भाऊसाो खांडेकरांच्या निधनानंतर कांही काला- वधीत प्रसिध्द पत्रकार, टीकाकार व साहित्यिक भाऊसाो माडखोलकर यांचे व क्रांतीसिंह नाना पाटील यांचे देहावसान झाले 'तेजस्वी पुत्र – ग. त्र्य. माड- खोलकर' हा लेख कु. रंजना बेकनाळकरने लिहीला आहे. यामध्ये 'त्यांच्या' 'मुक्तात्मा' कादंबरीचा आधार घेऊन जीवन चरित्र रेखाटले आहे तर 'हा दोष कुणाचा' हा विचार प्रवर्तक लेख 'शैलज पाटील यांनी क्रांतीसिह नाना पाटलांच्या निधनानंतर लिहिला आहे. आजची तरुण पिढी क्रांतीकाराना विसरली आहे. यावर अप्रत्यक्ष वाद उपस्थित केला आहे.

'काव्यातून हा गुलाब फुलला', हे स्वनिर्मित नाटक बी. आर. लांडे यांनी लिहिलेल्या थोडया भागाचा उमेदमध्ये समावेश आहे. त्यात ग्रामीण जीवन- व्यथा प्रकटकरण्याचे सामर्थ्य दिसून येते. तसेच

सांस्कृतिक सण ' दसरा ' या निमित्याचा ' भुताग्रज ' (टोपन नाव) यांनी लिहला आहे. तात्पर्य, घडलेल्या तत्कालीन घडनांचे प्रतिबिंब ' उमेद ' मध्ये पडलेले आहे. त्याशिवाय विविध सारे, पुढच्या अंकाची आकर्षक जाहीरत, बौध्दीक कूट प्रश्न इ. विविधलेले अंक नटण्याचे श्रेय शैलज पाटील शामलकांत गवस या संपादनकर्त्याचे श्रेय आहे.

## ' उमेद ' मधील कविता :

'सिध्दापा धनगर' यांच्या जेव्हा भूकंप होतील 'दोन रुपे', 'स्मृती', 'केवळ खेळ', 'म्हणून जपतो आहे', या कवितांपैकी कांही दीर्घ असून सामाजिक जाणिवेतून आशावाद, भूकंप झालेतरी 'पणती' माध्यमातून तुम्ही जळत रहा असा संदेश 'भूकंप होतील' या कवितेतून दिला आहे. केवळ वेळ म्हणून व 'जपतो आहे' यातून उत्कट आशावाद व भावनाशिलता आहे. मांडणी मुक्त छंदातुन संथ प्रवाही संभ्रमाने मनाला भुरळ पाडणाऱ्या ह्या कविता 'कविता' म्हणून योग्य आहेत. शामलकांत गवस वारसा या कवितेपेक्षा वेगळी आणि शृंगार रसप्रधान कविता 'सुन्दर सुन्दर' ही कविता म्हणजे मोरोपंताच्या अवघड यमकबध्द आर्यसारखी आहे. यात पोक्त शब्द रचना बौध्दीक परिपक्वता व कोमल नाही देहाचे सुंदर वर्णन मार्मिक शब्दातून दिसत असता सौंदर्य शाप की वरदान! येथवर येवून पोहचतो. शब्दाच्या बाबतीत 'र' धमाल उडाली आहे शैलज पाटील यांच्या सर्व कविता मुक्त छंदात्मक असून मुख्यार्थास बाजूस सारुन गहन लक्ष्यार्थात नेऊन सोडणाऱ्या आहेत. 'ज्योत विझली' भाऊसो खांडेकरां-च्या निधनानंतरची अस्वस्थता आहे. वक्रोक्तीमुक्त 'शेताचे गाणे' 'परीसर' प्रेम आर्तगर्यात सामाजिक परिस्थिती अवलोकन! मोजकेच शब्द, लिकष्ट अर्थ पण वाचताना आनंद होतो (न समजताही). सयाजीराव खोत यांची ' काल आणि आज' ही कविता सामाजिक जाणिवेतून निर्माण झालेली आहे. उघडी नागडी प्रजा थिजली, हिंडतेच रस्तोरास्ती' असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. 'तुझीच साथ' ह्या कवितेतून प्रेममय प्रसंग आहे. एकंदरीत विचार करता कवी म्हणण्यास लायक होईल. पण वाचन हवे 'दूर जावे' व 'ते स्वप्न' या कवितेतून 'देसाई एस. ए.' यांची आशा निराशाची घालमेल तात्विक विचारांची जपणूक बोध होण्यास सोप्या कविता 'इकबाल सय्यद' यांच्या हृदयकिनारा व 'स्वप्न स्वप्न मी' या कविता लिहताना कवी भावनावश झालेला आढळतो. शब्दाची गुंफण चांगली आहे. पण सातत्य हवे. तसेच अनिलकुमार शेट्टी (हिंदी) यांच्या 'स्मृती पुष्पांत' ह्या कवितेपेक्षा 'दव' ही कविता हळवी बालक स्वत:शीच खेळत असावे अशी वाटते. कुंभार वी. जी. यांची 'तारुण्य' दुसऱ्याच्या अंतर्मनातील शोध म्हणावी लागेल. ही कविता जमादार यांची 'प्रभात' व खापरे एस यांची धनगरराजा या कविता बालबोध आहेत. अशा ह्या सर्व कवींनी प्रयत्नवादी बनले पाहिजे.

## झुंझार – लेख

'उमेद' च्या मानाने झुंझार हा आकारापासून तो विचारापर्यंत लहान आहे. तरीही 'झुंज' देण्याची हिम्मत आहे, म्हणून झुंझारची स्थापना उशिरा होऊनही पाच अंक काढलेत याबद्दल त्यांच्या संपादन करणाऱ्या सौ आर. चे व सहाय्यकांचे कौतूक केले पाहिजे. जयवंत पाटील, दगडू काशिद व अन्य काही यानी साहित्य जमविण्यास बरेच परिश्रम घेतले आहेत. कारण बालपणाच्या सीमा उल्लंघतांना तारुण्याचा उंबरठ्या वर असताना मनाची मोठी रंजक असते एका बाजूला बालबोधता तर दुसऱ्या बाजूला धाडस अशा अवस्थेतही लिखाण करायला उठणाऱ्या कवी लेखकांचे अभिनंदन करायला नको का?

' याचेच नाव जीवन ' हे स्वरुप वर्णन कु एम. आय. पेडणेकरने लिहले असून जीवनावरील अनेक तत्वांच्या गोळाबेरीजेने सुत्रबध्द पध्दतीत गोवले आहे. उमेदप्रमाणेच येथेही सामाजिक जाणिवांचे ज्वलंतपडसाद यांचे स्वरूप कांही प्रमाणात उमटले आहेत. पैकी ' हुंडा बंदी झालीच पाहिजे' असे मत डी. के. लाटकरांनी ठासून व्यक्त केले आहे.



Scanned with CamScanner

'हुंडा म्हणजे मुलीच्या बापाच्या गळ्यातील मृत्युघंटा' असे व्यक्त केले, वाचकांच्यावर, काय करायचे ? अशा प्रश्नांतून हुंड्यासंबंधी विचार पूर्ण होतात. 'संध्या' जयवंत पाटील यांचा लेख सागर किनारा अन् माडाच्या रांगेत वाळूच्या सानेत असताना होणारा सूर्यास्त ही निसर्गाची बाब पण गुंफण मनात सलणाऱ्या संध्या–कालची सल " अं ! हो ! हॅलो संध्या " ची आहे. हा अलेकाचा सजगाच्या भावनेचा तादात्म्य पावतो. 'जीवन धवल' हा लेख 'अनाम' नावाच्या (टोपण) स्वरूपी लिहून येतो. २ आक्टोबर गांधी जयंती हे विषयशून्य आहे. थोर मोठे आज आपल्यात अस्तित्वाने नसले तरी विचाराने, आदर्शाने आहेत. तेव्हा त्यांच्या महानतत्वाची जोपासना करायला शिकले पाहिजे. हाच संदेश प्रश्नार्थक उद्बोधनाने कार्यप्रवृत्तीचा संदेश दिला आहे.

संग्राहक प्रवृत्तीतून हे साहित्य नवनिर्मित झाले असे मानावे लागते आहे. कोळी बी. ए. यांचे लेखात थोड्या प्रमाणात पण प्रयत्नवादी झलक आहे. सुविचार अलंकारीक व अलंकाराने वाङ्मयाला शोभा येते. कलेच्या विविध अंगातून संग्रह-संचय प्रवृत्ती ठेवायला हरकत नाही. शैलज पाटील यांचा गोमंतकाची माहीती देणारा वर्णन–चिंतनपर लेख या भित्ती पत्रकाचे भूषण आहे.

## झुंझार मधील कविता स्वरूप :

'निसर्ग' ही कविता 'सखा' यानी नारळी पौर्णिमेच्या सणाचे वर्णन, निसर्गाविना नाही कोण हेच स्पष्ट केले आहे. य. काशिद यांच्या कविता उमेद व झुंझार मध्ये व्यापून आहेत. 'भरभराट' 'फुलांचा भोग' 'गुलाम बनलो' 'विज्ञानयुग' 'शोक' 'सुवासिनी' इ. कविते–तून वैज्ञानिक प्रगतीच्या सामाजिक जाणिवा व्यक्त होतात प्रयत्न उत्कृष्ट आहे. अशा प्रकारचे अनेक कवी झुंझार मध्ये आहेत. एस. घाटगे, जयवंत पाटील, पाटील बी. के., दीपक लाटकर, बाबू धुळाणावर, कांबळे एम एस., खटावकर, बि. म. टेळे, सुधाकर शिंदे इ. कवींच्या कविता असून बऱ्याच कवितेतून प्रेम विषय आहे.

नैसर्गिक प्रेरणा त्यामुळे ह्या रंजनवादी दृष्टीतून सर्वच कवींचा व्याप व पसारा दिसतो. लिखाणात सातत्य असणे हेच समृध्दी चे लक्षण होय. 'सुधाकर शिंदे' यांच्या 'रुपवती' व 'ढब्बू' या कविता विनोदमय वात्रटिका होत. याशिवाय इतर अनेक कवी कवियत्रीनी भरपूर साहित्य निर्माण केलेले आहे. सविस्तर उल्लेख करणे येथे शक्य नसल्याने ते वाचन, मनन व अनुभवाची शिदोरी बरीच गोळा करण्याचा प्रयत्नात असल्याने त्यांचे लिखाण निश्चितच रुंदावेल

या सर्व प्रयत्नात श्री. शैलज पाटील यांची उमेद लक्षणीय आहे. त्यांच्या मनात विचार कल्पनांच्या भरा-ऱ्या आहेत. जुने जाऊ द्या मरणालागुन यातील बंडखोरीने ते सतत धुसपुसत असतात. पाचपंचविसांचा ग्रुप गोळा करुन त्यांचं सतत कांहीना कांही मंथन चालू असतं. शैलज हा उद्याचा बंडखोर लेखक आहे. लोकशाही, समाजवाद, निधार्मियकता या राष्ट्रीय उद्बोधांचा क्रि-याशील आश्रम ज्याला अस्वस्थ बनवतो आहे. असा हा एक उदयोन्मुख क्रांतिकारी विचारवंत आहे. त्याच्या या साऱ्या अस्वस्थ हालचालीचे प्रतिबिंब म्हणजे या वर्षीचे 'उमेद' चे सतत निघणारे रुपसुन्दर अंक शैलज उद्या उमेद उफाळचाचा क्रांतीकारक नेता आणि करुण कारुण्याचा विचारवंत लेखक बनला तर त्याची जातकुळी या भिंत्तीपत्रकात–" उमेद " मध्ये शोधणे मनोरंजक ठरेल.

एकंदरीत पाहता 'उमेद' व 'झुंझार' मधून लिह-लेले साहित्य ज्यांचा विशेष उल्लेख केला आहे ते कमी अधिक फरकाने ही एक मराठी वाङ्मयाची सेवा होय. हीच परंपरा कायम टिकून विद्यार्थ्यांना साहित्यिक ओढ निर्माण करण्यास मनोरंजन करण्यास भितीपत्रके बरीच उपयुक्त आहेत. पण इंग्रजी किंवा हिंदी लेखन विचार समृध्दी यांचा अभाव जाणवतो ही त्रुट पुढील वर्षी भरुन निघावी अशी आशा आहे. मा. प्राचार्य यांचा आशीर्वाद असाच राहिला आणि प्रा. विठ्ठल बन्ने यांची युवकांच्या उमेद उर्मीना सतत लाभणारी प्रेरणा अधिक उत्साहाने मिळत राहीली तर भित्तीपत्रकांच्या प्रयत्नातून अनेक कवी लेखकांचा जन्म होईल.



Scanned with CamScanner

# - प्राध्यापक वर्ग -

१) प्राचार्य बी. बी. देशमुख एम. ए.

२) प्राध्यापक डॉ. एस. जी. गोकाककर एम.ए.पी.एच.डी

३) ,, एस. टी. जाधव एम. ए.

४) ,, बी. के. सोरटे ,,

५) ,, एन. आर. दुन्डगेकर एम्.ए.एल्.एल्.बी.

६) ,, व्ही. एस. बन्ने एम्. ए.

७) ,, ए. ए. पवार ,,

८) ,, व्ही. एन. चंद्रमड ,,

९) ,, सी. एस. गवसणे एम्. ए.

१०) ,, के. व्ही. कुपडे ,,

११) ,, के. बी. केसरकर ,,

१२) ,, सौ. एस. एम. जगताप ,,

१३) ,, सौ. एम. एन. कोटीभास्कर ,,

१४) ,, डी. के. दंडगे एल् एल्. बी.

१५) ,, ए. एस. मुधोळे एम्. एस्. सी.

१६) ,, पी. जी. कुलकर्णी सी. ए.

१७) ,, ए. एस. नाळे बी.ए.एचडी पी एड.

## मॅनेजिंग कौन्सिल

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमंत बाळासाहेब माने | अध्यक्ष |
| २) | ,, धोंडीराम कदम | उपाध्यक्ष |
| ३) | ,, डॉ. गणपतराव सावन्त | ,, |
| ४) | ,, प्राचार्य बळवन्तराव देशमुख | सेक्रेटरी |
| ५) | ,, ॲड. श्रीपतराव शिन्दे | सदस्य |
| ६) | ,, शंकरराव चव्हाण | ,, |
| ७) | ,, नागाप्पणा बटकडली | ,, |
| ८) | ,, गणपतराव देसाई | ,, |
| ९) | ,, धोंडीराव पताडे | ,, |
| १०) | ,, बाबूराव मोहिते | ,, |
| ११) | ,, शन्करराव देसाई | ,, |
| १२) | ,, यंशवंत फडणीस | ,, |
| १३) | ,, प्रा. नामदेव कुन्डगेकर | ,, |
| १४) | ,, प्रा. एस. टी. जाधव | ,, |
| १५) | ,, बी. एस. मोहिते | ,, |

## सेवक वर्ग

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जे. अे. सबनीस, | सुपरीटेंडें |
| २) | श्री. टी. ए. पाटील | ग्रंथपाल |
| ३) | श्री. एस्. मोहिते | अकौंटंट |
| ४) | श्री. व्ही. एम गवळी | लेखनिक |
| ५) | ,, बी. बी. पुन्डपळ | ,, |
| ६) | ,, बी. डी. रेगडे | ,, |
| ७) | ,, वाय. डी. पाटील | ,, |
| ८) | कु पी. जी. चोथे | ,, |
| ९) | श्री. बी. आय. रामपुरे | शिपाई |
| १०) | एस. एस. गवळी | ,, |
| ११) | पी. के. जाधव | ,, |
| १२) | ,, बी. एस. सावन्त | ,, |
| ३) | ,, डी. एम. मोरे | ,, |

Scanned with CamScanner



' नाटकी ' माणसं



